cmyk

## संपादकीय

### युद्धात अमेरिकेची उडी

इसायल-इराण यांच्यात तणाव वाढल्यानंतर अमेरिका इराणवर हल्ला करेल, असा अंदाज होता तो खरा ठरला. युद्धात उतरण्याबाबत दोन आठवड्यांनी निर्णय घेऊ, असे अमेरिकेने म्हटले होते; परंतु प्रत्यक्षात रविवारीच भारतीय वेळेनुसार पहाटे साडेचार वाजता अमेरिकेची बी-२ बॉम्बर विमाने इराणच्या हद्दीत घुसली. या विमानांनी अमेरिकेच्या मिसुरी एअरबेसवरून सुमारे ११,४०० कि. मी. अंतर पार करताना सलग ३७ तास प्रवास केला होता. त्यांनी इंधनही हवेतल्या हवेत भरले. या विमानांनी बंकर बस्टर बॉम्ब आणि टॉम हॉक क्षेपणास्त्रांनी इराणच्या फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान या आण्विक स्थळांवर हल्ले केले.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६२ | बुधवार, दि.२५ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### स्था.स्वराज्य संस्था निवडणूक दिवाळीनंतर?

मुंबई : राज्यातील महानगरपालिकांचे निवडणुका दिवाळीनंतर होण्याची शक्यता आहे. कारण नगरविकास विभागाने सुधारित जीआर काढला आहे. या जीआरमध्ये सर्व महानगरपालिकांना ६ ऑक्टोबरपर्यंत अंतिम प्रभाग रचना अहवाल देण्याच्या सूचना देण्यात आली. त्यामुळे राज्यातील सर्व महापालिका निवडणुकांचे बिगुल दिवाळीनंतर वाजणार आहे. राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान होणार आहे.


# शेतकऱ्यांना दिलासा; पुढील ५ दिवसात पाऊस पडणार

## वादळी वाऱ्याची शक्यता; रखडलेल्या पेरण्या पुन्हा सुरु होणार

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यभरात पुढील पाच दिवस पावसाला पोषक स्थिती तयार झाली असून मराठवाड्यात दि. २५ जून ते २८ जूनपर्यंत पावसाची हजेरी राहणार असल्याचे प्रादेशिक हवामान केंद्राने सांगितले आहे. मराठवाड्यात अनेक भागात वादळी वारा व मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. हा पाऊस वादली वाऱ्यासह पडणार आहे.**

गेल्या काही दिवसापासून मराठवाड्यात पावसाने दडी मारल्याने सोयाबीन पेरण्या रखडल्या होत्या. तसेच कमी ओलीवर कापसाची लागवड केल्यावर उगवलेला कापूस सुध्दा सुकण्याच्या



मार्गावर होता. त्यामुळे पाऊस कधी पडेल, याकडे मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले होते. आता हवामान विभागाने नव्याने अंदाज सांगितला असून मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार, दिनांक २४ व २५ जून रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, परभणी व हिंगोली जिल्हयात, दिनांक २६ जून रोजी छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात ◀◀ पान २ वर

### सोयाबीनच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सोयाबीनची पेरणी करण्यास पावसामुळे विलंब झालेला आहे. सोयाबीन पेरणी लवकर झाली तर उत्पादनातही वाढ होते. यंदा मात्र पेरणी उशिरा होणार असल्याचे उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात...

### राज्य सहकारी संघाची निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न–दरेकर

मुंबई–महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची पंचवार्षिक निवडणूक होत आहे . एकूण १२ उमेदवारानी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मी मुंबई विभागीय विभागातून मी ही निवडणुक लढणार आहे. ही निवडणूक बिनविरोध करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे असे भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे.

### माझ्या मनात कोणतंही काळं नाही–भास्कर जाधव

मुंबई–माझ्या मनात कोणतेही काळे नाही, कोणतेही भेदाभेद नाही, मी कोणतीही गोष्ट फसवून करणार नाही लपवुन करणार नाही असे शिवसेनेचे कोकणातील नेते भास्कर जाधव यांनी म्हटले आहे.

### संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी जेजुरी नगरीत

जेजुरी–संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आता खंडेरायच्या जेजुरी नगरीत पोहोचली आहे. त्यापूर्वी वारकरी विसव्याला बसून देवाचे भजन करत फुगडी खेळत उत्सहात जेजुरीकडे निघाले आहे. सर्वत्र ज्ञानबा–तुकारामांचा जयघोष ऐकू येत आहे.

### निवडणूक आयोगाकडून राहुल गांधीना चर्चेसाठी निमंत्रण

नवी दिल्ली–निवडणूक आयोगाकडून राहुल गांधीना चर्चेसाठी निमंत्रण देण्यात आलं आहे. १२ जूनलाच आयोगाकडून ईमेलद्वारे पत्र पाठवण्यात आले होते. मात्र राहुल गांधींकडून आयोगाल अद्यापतरी कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही.

### सोन्या– चांदीच्या दरात घसरण

जळगाव–सराफ बाजारात सोन्या चांदीच्या दरात आठवडाभरानंतर मोठी घसरण झाली आहे. सोन्या दरात तब्बल १६०० रूपयांनी तर चांदीच्या दरात १ हजार रुपयांची घसरण झाली आहे. सोन्याचे दर जीएसटी सह १ लाख २१९ रुपयांवर तर चांदीचे दर जीएसटीसह १ लाख ९ हजार १८० रुपयांवर पोहोचले आहेत.

### नागरिकांची गोदाकाठी पूर पाहण्यासाठी गर्दी

नाशिक–पावसाच्या विश्रांतीनंतर नागरिकांची गोदाकाठी पूर पाहण्यासाठी गर्दी. सकाळपासून पावसाची नाशिकमध्ये विश्रांती. गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग. पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने नदीपात्रातील पाणी पातळीत वाढ. गोदावरी नदीला पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने पूर पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी दिसून आली आहे.

### गुजरात उच्च न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी

अहमदाबाद–गुजरात उच्च न्यायालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. ईमेलद्वारे ही धमकी देण्यात आली. अहमदाबाद पोलिसांकडून गुजरात उच्च न्यायलयात तपासणी सुरू आहे.

### अजित डोभाल यांनी घेतली चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट

नवी दिल्ली–बीजिंगमध्ये चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांची राष्ट्रीय सल्लागार अजित डोभाल यांनी भेट घेतली आहे. दोन्ही देशांमध्ये अलिकडील काळात घडलेल्या घडामोडींचा आढावा घेण्यात आला. सोबतच भारत–चीन संबंधांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

### टोमॅटोची उच्चांकी आवक, दर घसरले

पुणे–जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव टोमॅटो बाजारात २१ हजार टोमॅटो क्रेडची उच्चांकी आवक झाली. दरम्यान टोमॅटोचे दर घसरले असून व्यापाऱ्यांनी प्रतवारीनुसार टोमॅटोला पाच ते पंधरा रुपये प्रति किलो असा बाजारभाव दिला.

### फार्मर आयडी नसेल तर पीक विम्याचा लाभ नाही

मुंबई– फार्मर आयडी नसेल तर पीक विम्याचा लाभ मिळणार नाही, अर्ज देखील नाकारला जाणार अशी माहिती कृषी विभागाने दिली. शेतकऱ्यांनी लवकरात लवकर फार्मर आयडी काढून घ्यावे, असे आवाहन महसूल आणि कृषी विभागाने केले आहे. कृषी विभागातील शासकीय योजनेसाठी आता शेतकऱ्यांना फार्मर आयडी बंधनकारक असेल.

### पहिलीपासून हिंदी सक्ती नको– शरद पवार

मुंबई : पहिलीपासून हिंदी सक्तीवरून राज्यात राजकारण तापले असताना आता शरद पवारांनीही त्यावरून भूमिका घेतली आहे. पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती नको असे मत शरद पवारांनी व्यक्त केले आहे. मात्र हिंदी भाषा शिकवणे महत्त्वाचे असल्याचेही ते म्हणाले.

### सपा आमदार अबू आझमींचा माफीनामा

मुंबई–पंढरपूरच्या वारीबाबतच्या वक्तव्यावर सपाचे आमदार अबू आझमी यांनी माफी मागितली आहे. वारकरी समाजाच्या भावना दुखावण्याचा हेतू नव्हता असे आझमींनी म्हटले आहे.

# कटाचा सूत्रधार नेहमी पडद्या मागेच असतो

## उज्वल निकमांनी कोर्टात वाल्मिक कराडचा डाव हाणून पाडला



**बीड । प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची दि. २४ जून बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानंतर ॲड. उज्वल निकम यांनी या प्रकरणाच्या सुनावणीवर भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे. कटाचा सुत्रधार हा नेहमी पडद्या आड राहून आपले कृत्य करत असल्याचे आम्ही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्याचे ते म्हणाले. त्यामुळे वाल्मिक कराड यांच्या वकिलाचा डाव निकम यांनी हाणून पाडल्याचे दिसते.**

संतोष देशमुख खून प्रकणाची मंगळवारी बीड न्यायालयात सुनावणी पार ◀◀ पान २ वर

### “ पुढील सुनावणी ७ जुलैला

मा. न्यायालयासमोर आम्ही प्रतिपादन केले असून येत्या ७ जुलैपर्यंत न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. असेही सरकारी वकील उज्वल निकम म्हणाले.

### “ वाल्मिक कराडच्या वकीलाचा युक्तीवाद

या प्रकरणातील तीनही गुन्हे वेगवेगळे आहेत. प्रत्येक एफआयआरची वेगवेगळी चारशीट झाली पाहिजे. वाल्मीक कराडचा मकोकाशी काहीही संबंध नाही. त्यांचा गुन्हा आणि एफआयआर वेगळा आहे. सहा डिसेंबर रोजी वॉचमन सोनवणे याला मारहाण झाली. यात खंडणीचा कुठलाही संबंध नाही. शिवराज देशमुख हा मुख्य फिर्यादी आहे. त्याच्या जबाबात कराड यांचे नाव नाही. १५/१/२०२५ रोजी कराड याला हत्या प्रकरणात आरोपी करण्यात आले. अण्णा म्हणजे वाल्मीक नव्हे संतोष देशमुख यांना देखील अण्णा बोलावले जात होते. केवळ अण्णा नावाने वाल्मीक कराडला आरोपी बनवण्यात आले. कराडच्या वकिलाने मुख्य घेण्यात आलेले जबाब न्यायालयासमोर मांडले. सीआयडीने मांडलेले हे त्यांचे मत आहे. यात पोलिसांचा तपास गरजेचा होता.

### “ विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांचा युक्तिवाद

संपूर्ण केसचा हेलिकॉप व्ह्यू घ्यावा. आवादाला दोन कोटी मागितले. वाल्मीक कराड हा दिग्दर्शक जो पडद्या मागे आहे. संतोष देशमुख यांनी निकटवर्ती यांना सांगितले होते. यातील डिजिटल पुरावे पुरेसे आहेत. या घटनेनंतर कराड, चाटे अस्वस्थ झाले. त्यांनी नुसती मारामारी काय करता असा अप्रत्यक्षपणे संदेश दिला. सुदर्शन घुले हा गँग लीडर आहे. मात्र पडद्यामागे त्याचा सूत्रधार कराड आहे. या प्रकरणाचा तपास पोलिसांनी केला नाही तर तज्ञ सीआयडी टीमने केला आहे. याचा कंट्रोल कराड कडे होता. कोल्हापुरातील बाल हत्याकांडातील संदर्भ दिला गेला.

# अजितदादांच्या खात्यावर शिंदेंच्या मंत्र्यांचा वॉच

## एकनाथ शिंदेंचे आमदारांना लक्ष ठेवण्याचे आदेश; दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची भेट



**मुंबई । प्रतिनिधी**

**जे आपल्या हक्काचे आहे ते घेतलेच पाहिजे असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी निधी वाटपावरुन आक्रमक पवित्रा घेतला आहे. अजितदादांच्या खात्यावर आता शिंदेंच्या मंत्र्यांचा वॉच असणार असल्याचे दिसत असून अजित पवारांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. यावेळी नेमकी चर्चा काय झाली हे मात्र समजू शकले नाही.**

अजित पवार निधी देत नाही असा नाराजीचा सूर लावलेल्या शिवसेनेच्या मंत्र्यांना एकनाथ शिंदे यांनी आदेश दिला आहे. अजित ◀◀ पान २ वर

# झेडपी सिईओंनी भेट देताच अधिकारी, कर्मचाऱ्यांची धावपळ

**● बीड पं. समितीमधील चित्र; पदभार घेताच जितीन रहमान यांनी लावला कामांचा धडाका**

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जितीन रहमान यांनी पदभार घेतल्यानंतर अवघ्या दोन–तीन दिवसातच कामाचा धडाका लावला आहे. सिईओंनी मंगळवारी बीड पंचायत समितीला भेट देऊन विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ झाल्याचे समजते.

बीड जिल्ह्यात अधिकारी येण्यास तयार नसतात, याचा काही दिवसापासून बीडकरांना अनुभव आलेला आहे. झेडपीला कोणीही अधिकारी येण्यास तयार नसताना आदेश मिळाल्यानंतर ◀◀ पान २ वर



# चक्क हातपम्प घातला गटार कामात

**संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार–उल्हास गिराम**



बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेचा गलथान कारभार. मागील चार वर्षांपासून नगरपालिकेवर प्रशासक आहे. या काळात पालिका प्रशासनाने मनसोक्त हात साफ करून घेतला. राजीव गांधी चौकातुन शासकीय आयटीआय च्या मागील रस्त्यावर ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६८.०० क्विंटल | १,८५५ | २,६७२ | २,४८३ |
| ज्वारी/हायब्रिड: ६९.०० क्विंटल | १,९०१ | ३,०५६ | २,४८१ |
| मका/लोकल:२१.००क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२६६ |
| तूर : ३९.०० क्विंटल | ६,२०० | ६,७४१ | ६,४९४ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,४४१ | ६,४४१ | ६,४४१ |
| बाजरी: ८१.५० क्विंटल | १,९०० | २,८२२ | २,३५८ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:४.५० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा:९.५० क्विंटल | ५,२०० | ६,७०० | ५,५५२ |

# बापाची चिंता मिटली; लाडक्या लेकींची शासन घेतंय काळजी!

## बीड जिल्ह्यात ५२९२ मुलींना मिळणार प्रत्येकी १ लाख १ हजार रुपये

**अशोक खाडे । बीड**

**लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये शासनाकडून दिले जात असताना राज्य सरकार आता लाडक्या लेकीची सुध्दा काळजी घेत आहे. त्यामुळे बापाची चिंता आता मिटली असून बीड जिल्ह्यातील ५ हजार २९२ मुलींना वयाच्या १८ वर्षापर्यंत प्रत्येकी १ लाख १ हजार रुपये मिळणार असल्याची माहिती एकात्मिक बालविकास अधिकारी कालिदास बडे यांनी दिली आहे.**

राज्य शासनाची लाडकी बहिण योजना सध्या खूपच प्रभावी ठरत असून लाडक्या बहिणी बरोबरच राज्यात १ एप्रिल २०२३ पासून माझी कन्या भाग्यश्री या योजनेच्या जागेवर लाडकी लेक योजना राबवली जात आहे. त्यामुळे या तारखेपासून पुढे जन्मलेल्या मुलींना या योजनेचा लाभ दिला जाणार असून महिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून ही योजना राबवली जात आहे. एका जोडप्याच्या दोन मुलींपर्यंत या योजनेचा लाभ दिला जाणार असून सध्या जिल्ह्यात ५ हजार २९२ पात्र लाभार्थी मुली आहेत. सध्या जिल्ह्यातील ३ हजार २७४ अंगणवाडीच्या माध्यमातून हे कार्य सुरु आहे. मुलीचा जन्म झाल्यापासून ते तीच्या वयाच्या १८ वर्षापर्यंत एक



लाख १ हजार रुपयाचा लाभ त्या मुलीला देण्यात ◀◀ पान २ वर

### पाच टप्प्यात मिळणार लाभ

- मुलीचा जन्म झाल्यावर ५००० रु.
- इयत्ता पहिलीच्या वर्गात गेल्यावर ६००० रु.
- इयत्ता सहावीच्या वर्गात गेल्यावर ७००० रु.
- इयत्ता आकरावीच्या वर्गात गेल्यावर ८००० रु.
- १८ वर्ष वय पुर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये
- एकूण १ लाख १ हजार

### वडवणी तालुका सर्वात मागे

आंबाजोगाई–६२८, आष्टी–४७१, बीड १–२८९, बीड २ –२३३, बीड ग्रामीण ईस्ट–५०१, बीड ग्रामीण वेस्ट–३५२, धारुर ग्रामीण–३५१, गेवराई १ –१२८, गेवराई २–३६९, केज–४२४, माजलगाव–५४५, परळी–३३८, पाटोदा–२८५, शिरुर–२९२ लाभार्थी असून वडवणी (१०५) तालुका सर्वात मागे आहे. एकूण–५२९२ लाभार्थी आहेत.

cmyk

## अग्रलेख

# युद्धात अमेरिकेची उडी

इस्रायल-इराण यांच्यात तणाव वाढल्यानंतर अमेरिका इराणवर हल्ला करेल, असा अंदाज होता तो खरा ठरला. युद्धात उतरण्याबाबत दोन आठवड्यांनी निर्णय घेऊ, असे अमेरिकेने म्हटले होते; परंतु प्रत्यक्षात रविवारीच भारतीय वेळेनुसार पहाटे साडेचार वाजता अमेरिकेची बी-२ बॉम्बर विमाने इराणच्या हद्दीत घुसली. या विमानांनी अमेरिकेच्या मिसुरी एअरबेसवरून सुमारे ११,४०० कि. मी. अंतर पार करताना सलग ३७ तास प्रवास केला होता. त्यांनी इंधनही हवेतल्या हवेत भरले. या विमानांनी बंकर बस्टर बॉम्ब आणि टॉम हॉक क्षेपणास्त्रांनी इराणच्या फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान या आण्विक स्थळांवर हल्ले केले. या हल्ल्यात आण्विक तळांचे मोठे नुकसान केल्याचा अमेरिकेने दावा केला तर इराणने त्याचा इन्कार केला. या तळावरील अण्वस्त्र आधीच इतरत्र हलवल्याचे इराणने म्हटले आहे.

अमेरिकेने या कारवाईला 'ऑपरेशन मिडनाईट हॅमर' असे नाव दिले होते. यात एकूण १२५ लढाऊ विमाने सहभागी होती. त्यात ७ बी-२ बॉम्बर, फायटर जेट आणि इंधन भरण्यासाठी टँकर विमाने यांचा समावेश होता. प्रत्येक बी-२ विमानाने ३० हजार पौंडाचे बॉम्ब फेकले. दिशाभूल करण्यासाठी विमाने पॅसिफिक महासागरातून पाठविण्यात आली. त्यानंतर इराणने इस्रायलवर जोरदार क्षेपणास्त्र मारा करतानाच 'होर्मुझ खाडी' व्यापारासाठी बंद करण्याचा इशारा दिला. कच्च्या तेलाच्या व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग असलेली 'होर्मुझ खाडी' बंद करण्याच्या निर्णयाला इराणच्या कायदेमंडळाने मान्यता दिली. या खाडीतून जगातील २० टक्के कच्च्या तेलाचा व्यापार होतो. पश्चिम आशियातून भारतात येणारे बहुतांश कच्चे तेल याच मार्गाने आणले जाते.

यामुळे हा मार्ग बंद झाल्यास त्याचा देशातील इंधन पुरवठ्याला मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान या अणू केंद्रांवर हल्ला झाल्याचे इराणच्या अणूऊर्जा संस्थांनी मान्य केले असले तरी यामुळे आपला अणू कार्यक्रम थांबणार नसल्याचे म्हटले आहे. या तिन्ही ठिकाणी किरणोत्सर्ग होत असल्याचे अजून तरी स्पष्ट झाले नसल्याचे इराण आणि संयुक्त राष्ट्रांच्या अणूऊर्जा संस्थांनी म्हटले आहे. अमेरिकेने प्रत्यक्ष युद्धात उडी घेतल्यानंतर इराणने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी या हल्ल्याचा निषेध करताना म्हटले आहे की, भविष्यात घडणा-या घटनांना संपूर्णत: अमेरिका जबाबदार असेल. अराघची लवकरच रशियन अध्यक्ष पुतिन यांची भेट घेणार आहेत. इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी अमेरिकन हल्ल्याचे स्वागत करताना त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहेत त्यामुळे युद्धाचा आणखी भडका उडण्याची भीती व्यक्त होत आहे. अमेरिकन हल्ल्यानंतर इराणने इस्रायलवर जोरदार क्षेपणास्त्र हल्ले केले त्यामुळे तेलअवीव आणि अन्य काही शहरांमध्ये मोठे नुकसान झाले. इराणने सुमारे ३० क्षेपणास्त्रे सोडली.

त्यात किमान २० जण जखमी झाल्याचे सांगितले जाते. इराणने डागलेली क्षेपणास्त्रे अडवण्यास अथवा निकामी करण्यास इस्रायलच्या लष्कराला पुरेसा वेळच मिळाला नाही. तेलअवीव व जेरूसलेम शहरात स्फोटांचे आवाज ऐकू आले. हायफा या बंदराच्या ठिकाणालाही इराणने लक्ष्य केले. अनेक ठिकाणी इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक आयोजित करावी, अशी मागणी इराणच्या संयुक्त राष्ट्रांमधील राजदूतांनी केली आहे. अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेग्सेथ यांनी अमेरिकन हल्ल्यामागची भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, इराणमध्ये सत्तापालट घडविणे हे आमचे लक्ष्य नव्हते. आम्हाला इराणबरोबर युद्ध करायचे नाही, असेही ते म्हणाले. इराणच्या अणू कार्यक्रमामुळे अमेरिकेच्या हितसंबंधांना धोका निर्माण झाला होता म्हणून इराणच्या अणू केंद्रांवर हल्ला करण्याचे आदेश अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले, असे हेग्सेथ म्हणाले. हल्ल्यानंतर ट्रम्प म्हणाले, सर्व अमेरिकन विमाने इराणच्या हवाई हद्दीतून बाहेर पडली आहेत. फोर्डो नष्ट झाले आहे. सर्व विमाने सुरक्षितपणे परतली आहेत. जगातील कोणतेही सैन्य जे करू शकले नसते ते आमच्या सैन्याने केले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. आता शांततेची वेळ आहे.

जगातील कोणताही देश जे करू शकला नसता ते अमेरिकेने केले आहे, त्याची इतिहासात नोंद होईल. जगातील सर्वांत धोकादायक राजवटीला धोकादायक शस्त्रास्त्रांपासून दूर ठेवण्यासाठी आम्ही आवश्यक ती पावले उचलली आहेत. इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी म्हणाले, अमेरिकेने आमच्या अणूतळांवर हल्ले करून आंतरराष्ट्रीय कायद्याचे गंभीर उल्लंघन केले आहे. राजनैतिक चर्चा सुरू असताना हे हल्ले झाले. इराण आपला अणू कार्यक्रम थांबवणार नाही. आम्ही अमेरिकेचा असा बदला घेऊ जो अमेरिका कधीच विसरणार नाही. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर हुथी बंडखोरांनी इराणच्या बाजूने युद्धात उतरण्याची घोषणा केली आहे. ब्रिटनने अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्याचे समर्थन केले आहे तर सौदी अरेबियाने इराणला संयम बाळगण्यास सांगितले आहे. ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार द्यावा, अशी मागणी करणा-या पाकिस्तानने अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्याचा निषेध केला आहे. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघटनेने चिंता व्यक्त केली आहे. सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस म्हणाले, इराणविरोधात बळाचा वापर हा चिंतेचा विषय आहे. आंतरराष्ट्रीय सुरक्षेसाठीही धोका निर्माण झाला आहे.

युद्ध नियंत्रणाबाहेर गेले तर त्याचा सामान्य लोकांवर, संपूर्ण प्रदेशावर, जगावर वाईट परिणाम होऊ शकतो. संकटाच्या या काळात अराजकता आणि विनाशाची मालिका थांबवणे गरजेचे आहे. यावर कोणताही लष्करी उपाय नाही. पुढे जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे संवाद आणि शांतता हाच आहे. अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांचा रशिया, चीनसह अनेक देशांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या हल्ल्यांमुळे मध्य पूर्वेतील संघर्षाची तीव्रता वाढण्याची भीती आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने यावर चिंता व्यक्त केली असून शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे. इराणने प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर आणखी हल्ले करू, अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. यावर सुरुवात तुम्ही केली, आता शेवट आम्ही करू, असे इराणने म्हटले आहे. एकूणच काय सारे जग अणूबॉम्बच्या टोकावर उभे आहे.

# २२ वर्षे विवाहितेने सासरच्या लोकांना कंटाळून जीवन संपवले

**अंबड । प्रतिनिधी**

**घनसावंगी तालुक्यातील श्रीपतधामणगाव येथे सासरच्या लोकांकडून वारंवार होणाऱ्या पैशाच्या मागणीला कंटाळून दोन महिन्यापूर्वी लग्न झालेल्या२२ वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आपलं जीवन संपलं . सदरील घटना श्रीपतधामणगाव येथे २१ जून २०२५ रोजी दुपारी घडलेल्या हृदयद्रावक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. विवाहबद्ध झालेल्या २२ वर्षीय वैष्णवी रामेश्वर शिंदे हिने आपल्या सासरच्या लोकांकडून वारंवार होणाऱ्या पैशाच्या मागणीला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या प्रकरणी मृत विवाहितेच्या वडिलांनी घनसावंगी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पतीसह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार वैष्णवी चांदर (वय २२) हिचे लग्न ढाकेफळ (ता. घनसावंगी) येथील सर्जेराव चांदर यांच्या कन्येचा विवाह दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी रामेश्वर गुलाबराव शिंदे (रा. श्रीपतधामणगाव) याच्यासोबत मोठ्या थाटामाटात पार पडले होते. लग्नात ७ तोळे सोनं आणि ५ लाख रुपये देण्याची मागणी सासरच्या मंडळींनी केली होती. सर्जेराव चांदर यांनी साखरपुड्याच्या वेळी १ लाख रुपये रोख स्वरूपात दिले होते आणि नंतर लग्नातही त्यांच्या क्षमतेनुसार सगळी तयारी केली होती. विवाहानंतर सुरुवातीचे काही दिवस सासरी चांगले गेले, परंतु काही दिवसांतच सासरच्या मंडळींनी वैष्णवीला मानसिक आणि शारीरिक त्रास द्यायला सुरुवात केली. तिची सासू सुमनबाई, पती रामेश्वर आणि दीर दौलत हे तिला सतत पैशांसाठी त्रास देत होते. रामेश्वर याचे दारूचे व्यसन होते आणि तो वैष्णवीवर कृषी सेवा केंद्र सुरू करण्यासाठी माहेराहून आणखी ५ लाख रुपये आणण्याचा दबाव टाकू लागला. २१ जून सकाळी वैष्णवी हिने स्वत:च्या मोबाईलवरून आपल्या वडिलांना फोन करून या त्रासाबाबत माहिती दिली. तिच्यावर पुन्हा एकदा ५ लाख रुपयांच्या मागणीसाठी दबाव टाकला जात होता. वडिलांनी काही दिवस थांबण्याची विनंती केली. त्यानंतर तिने तिच्या चुलत भावालाही फोन करून या बाबतीत सांगितले होते. दुर्दैवाने, त्याच दिवशी दुपारी ३ वाजता संतोष शिंदे या ग्रामस्थाने तिच्या आजोबांना फोन करून वैष्णवीची तब्येत बिघडल्याची माहिती दिली. जेव्हा कुटुंबीय श्रीपतधामणगाव येथे पोहोचले, तेव्हा वैष्णवीने घरातील लोखंडी अँगलला साडीने गळफास लावून आत्महत्या केल्याचे दिसून आले. त्यावेळी घरातील कोणतीही सासरची व्यक्ती घटनास्थळी उपस्थित नव्हती. वैष्णवीचा मृतदेह शवविच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला आणि तिच्यावरच अंत्यसंस्कार त्याच दिवशी सासरी करण्यात आले. याप्रकरणी पती रामेश्वर शिंदे, सासू सुमनबाई शिंदे आणि दीर दौलत शिंदे यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी भा.दं.वि. कलम ४९८-अ, ३०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोलीस करीत आहे.



# वाळू उपसा केल्याप्रकरणी फौजदारी दाखल करणार-विजय चव्हाण



**जालना । प्रतिनिधी**

**मंगरूळ गोदावरी पात्रातून वाळू उपसा केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती उपविभागी अधिकारी तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी दिली. घनसावंगी तालुक्यातील मौजे मंगरूळ व मुद्रेगाव या ठिकाणावर प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार घनसावंगी श्री इथापे व त्यांच्या पथकासह पाहणी केली असता मौजे मंगरूळ येथे रेती उत्खनन केल्याचे दिसून आले.**

त्याचबरोबर मुद्रेगाव या ठिकाणी सुद्धा किनी द्वारे रेती उत्खनन करून ठिगारा केल्याचा दिसून आला. घटनेस्थळी पोहोचेपर्यंत दोन्ही ठिकाणावरून किनी पळून गेल्याचे दिसून आले. स्थानिक माहिती घेतली असता तेथे उत्खनन करणाऱ्या व्यक्तीचे नावे निष्पन्न झालेली आहेत . लवकरच त्यांच्या विरोधात फौजदारी स्वरूपाचा गुन्हा नोंद करण्यात येणार असून ज्या शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतामधून रस्ता उपलब्ध करून दिलेला आहे त्या शेतकऱ्यांच्या शेतावर बोजा टाकण्यात येणार आहे. दोन्ही ठिकाणचा संयुक्त पंचनामा करण्यात आलेला आहे पुढील कार्यवाही लवकरच करण्यात येणार आहे. अशी माहिती श्री विजय चव्हाण उपविभागीय दंडाधिकारी तथा तहसीलदार यांनी दिली आहे.

# ग्रामस्थ उपोषणाला बसताच काडीवडगाव जि.प.शाळेला मिळाले शिक्षक

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही एक ते सात पर्यंत आहे. एक ते सात पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासाठी फक्त तीनच शिक्षक होते.त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आसल्याने ग्रामस्थांना गट शिक्षणाधिकारी कार्यालयात उपोषणाला बसताच गावकऱ्यांच्या आंदोलनाची दखल घेऊन त्यांना तात्काळ शिक्षक देण्यात आले.**

जिल्ह्यात अनेक ठिकाणी जिल्हा परिषद शाळा विद्यार्थ्यां विना बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.तर ज्या ठिकाणी विद्यार्थी आहेत त्या ठिकाणी शिक्षकांच्या कमतरता आसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मोठे नुकसान होत आहे.अशीच तालुक्यातील काडीवडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १ ते ७ पर्यंत आहे. या शाळेत ११५ विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांना शिकवण्यासाठी तीन शिक्षक आहेत.दोन शिक्षकांचे पद रिक्त असतानांही त्या ठिकाणी शिक्षक रुजू होत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत होते. त्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत होता. शिक्षकांच्या मागणीसाठी अनेक वेळा गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे अर्ज विनंती करूनही दखल घेतली जात नसल्यामुळे ग्रामस्थांना गट शिक्षणाधिकारी कार्यालयात उपोषणाला मंगळवार दि २४ रोजी शालेय समितीचे अध्यक्ष बालासाहेब बादाडे,सरपंच गोविंद बादाडे यांच्यासह ग्रामस्थ उपोषणाला बसले. जोपर्यंत शिक्षक देत नाही तोपर्यंत आम्ही इथून उठणार नाही असा पवित्रा आंदोलकांनी घेतला.ग्रामस्थांची आक्रमकता पाहून गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षक देण्याचा तात्काळ निर्णय घेतल्याने ग्रामस्थांनी उपोषण मागे घेतले. यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष बालासाहेब बादाडे शेतकरी नेते जगदीश फरताडे गितेश आगे सरपंच गोविंद बादाडे,माजी सरपंच बालासाहेब राऊत,राधाकृष्ण बादाडे,राजेभाऊ बादाडे,बालासाहेब बादाडे,गितेश आगे,संतोष शिंदे,उत्तम राऊत, भैय्यासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

# अंशत: अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानासाठी थोरल्या पवारांचा शिक्षण मंत्र्यांना फोन!

## मुख्यमंत्री आणि अर्थमंत्र्या सोबत बैठक लावा बैठकीसाठी मला बोलवा-शरद पवार

**बीड । प्रतिनिधी**

**विनाअनुदानित आणि अंशत: अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याचे अनुदानासाठी निधीची तरतूद उपलब्ध करून द्या या मागणीसाठी शिषकांचे ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरू आहे. आज मंगळवार दिनांक २४ जून रोजी विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली विनाअनुदानित आणि अंशत: अनुदानावर काम करणाऱ्या शिक्षकांनी थोरल्या पवारांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या यावेळी क्षणाचाही विलंब न करता शरदचंद्रजी पवार साहेबांनी थेट शिक्षण मंत्र्यांना फोन करून निधीची तरतूद करण्याच्या सूचना दिल्या.**

अंशत: अनुदानित शाळांना टप्पा वाढिसाठी आवश्यक असणारा निधी मिळावा. या साठी विनाअनुदानित शाळेतीलज्ञशिक्षकांनी ५ जून पासून आझाद मैदानावरती आंदोलन सुरू केले आहे. हे आंदोलन सुरू असताना या शिक्षकांच्या शिष्टमंडळने राज्यातील अनेक वजनदार राजकीय नेत्यांच्या भेटी घेऊन निधी पदरात पाडून घेण्यासाठी धडपडत सुरू केली. त्याचाच एक भाग म्हणून आज मंगळवार दिनांक २४ रोजी विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे नेते श्री डॉ नरेंद्र काळे यांची भेट घेऊन थोरल्या पवार साहेबांची भेट घेण्याची व त्यांच्या कानावर हा प्रश्न टाकण्याची मागणी केली यावेळी डॉक्टर नरेंद्र काळे यांनी क्षणाचा ही विलंब न करता थोरले पवार साहेब यांची भेट घडवून आणली. या वेळी शिक्षण समन्वय संघाच्या वतीने शरदचंद्र पवार साहेब यांना निवेदन देऊन १४ ऑक्टोबर २०२४ ला शासन निर्णय झाला पण, त्याची कोणतीही तरतूद केली नाही याची सविस्तर माहिती. शिवाय या वेळी १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आणून दिले व आजपर्यंत चा झालेला इतिवृतांत त्यांना सांगितला. तसेच ५ जून पासून आझाद मैदानावर विनाअनुदानित आणि अंशत: अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांचे आंदोलन सुरू असल्याचे आदरणीय पवार साहेबांना सांगितले. यावेळी शरद पवार साहेब यांनी तात्काळ शालेय शिक्षण मंत्री श्री दादा भुसे यांना फोन करून टप्पा वाढीच्या निधी संदर्भात चर्चा केली. यावेळी पवार साहेबांनी शिक्षण मंत्री भुसे यांना टप्पावाडी संदर्भात जी आर काढला असेल तर याबाबत तरतूद करणे आवश्यक आहे. ही तरतूद आपण करावी असे सांगितले. याबाबत मुख्यमंत्री, अर्थमंत्री यांच्या सोबत चर्चा करायची असेल तर बैठक लावा या बैठकीसाठी मला बोलवा मी ही येतो, यावर चर्चा करून मार्ग काढू, आता शिष्टमंडळ पाठवत आहे त्यांच्या सोबत चर्चा करा, दादा भुसे साहेब यांना सांगितले. त्यानंतर हे शिस्टमंडळानी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेतली. या वेळी ना. दादाजी भुसे यांनी शालेय शिक्षण विभाग टप्पा वाढीच्या निधी संदर्भात सकारात्मक असून याविषयीचे प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवले आहेत. आपल्या या प्रश्नावर खुद्द मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री हे सकारात्मक आहेत. हा प्रश्न तात्काळ निकाली काढायचा असल्याचे शिक्षण मंत्र्यांनी या शिष्टमंडळाला सांगितले. या शिष्टमंडळात खंडेराव जगदाळे,सदानंद लोखंडे, मुक्ता आर्दड, संगीता राठोड, संदीप नरोटे, अमोल खरात, पुंडलिक रहाटे, वैजनाथ चाटे, अजय थूल, गजानन शिंगणे, संतोष पाटील, महेंद्र वाघमारे आदी बांधव उपस्थित होते.



## पान १ वरून...

### शेतकऱ्यांना दिलासा; पुढील

दिनांक २४ जून रोजी काही ठिकाणी तर दिनांक २५ व २६ जून रोजी तूरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या तर दिनांक २७ व २८ जून रोजी तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील चार ते पाच दिवसात कमाल व किमान तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही.

----------

### अजितदादांच्या खात्यावर

पवारांच्या खात्याकडे १४-१४ हजार कोटीचे दोन मोठे निधी आहेत, त्यावर लक्ष ठेवा. तो निधी कुठे वितरित होतो याची माहिती घ्या असा आदेश एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मंत्र्यांना दिल्याची माहिती आहे. कॅबिनेटच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची वेगळी बैठक घेतली. त्यामध्ये निधी वाटपावरुन शिंदेंच्या मंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याची माहिती आहे. महायुती सरकारच्या तीन घटक पक्षांमध्ये निधी वाटपासंबंधी सातत्याने धुसफूस सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यातही शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्याविषयी अनेकदा नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान आमदारांसह शिंदेंच्या मंत्र्यांचा अजितदादांच्या खात्यावर वॉच असणार असल्याचे यावरुन दिसत आहे. तसेच नाराटीनाट्यानंतर अजित पवारांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली असल्याचे म्हटले जात असून दोघांमध्ये नेमकी चर्चा काय झाली हे मात्र समजू शकले नाही. याआधी मंत्री उदय सामंत यांनी अजित पवारांची भेट घेतली होती. त्यामुले पवार-शिंदे यांच्यातील दुरावा स्पष्टपणे दिसत आहे.

**निधी वाटपावरुन या आधीही नाराजी**

अजित पवार आपल्याला निधी देत नाही अशी तक्रार करत शिवसेनेच्या मंत्र्यांनी या आधीही नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांनी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचीही भेट घेतली होती. परंतु निधी हा काही आपल्या खिशातून देत नाही, राज्याच्या तिजोरीला शिस्त आणण्यासाठी काही पावले उचलली जातात असे अजित पवारांनी या आधी स्पष्ट केले होते.

--------------------

### कटाचा सुत्रधार नेहमी पडद्या

पडली. यावेळ विशेष सरकारी वकिल उज्वल निकम यांची उपस्थिती होती. यावेळी तीन तास दोन्ही बाजूने युक्तीवाद चालला. वाल्मिक कराडच्या वकिलाने युक्तिवाद करत असतांना कराड यांचा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कटात हात नसल्याचे सांगत, या प्रकरणी मकाको लागत नाही. असे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीच्या या युक्तिवादाला आम्ही जोरदार विरोध केला. सोबतच न्यायालयाला हे स्पष्ट करून सांगितले की, आरोपी विरोधात काय काय पुरावे आहे. त्या संपूर्ण पुराव्यांची जंत्री आम्ही न्यायालयासमोर सादर केली. त्याच प्रमाणे कटाचा मुख्य सूत्रधार कायम पडद्यामागे असतो आणि आपल्या कटपूतल्यांचे आधारे तो वाईट कृत्य करत असतो. मात्र या प्रयत्न आपण हाणून पाडला आहे. अशी प्रतिक्रिया विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी दिली आहे.

----------

### चक्क हातपम्प घातला

नव्याने रस्ता व नाली काम झाले. या मार्गांवर असलेला हातपम्प (हापसा) बाजूला काढणे अपेक्षित होते. परंतु याचे गांभीर्य ना नगर पालिकेला ना संबंधित गुत्तेदाराला. चक्क हातपम्प गटार कामात घातला. संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले. गटाराच्या एकदम मधोमध हातपम्प असल्यामुळे एक बाजु पूर्णपणे कोंदली आहे. सुरळीत गटाराचे पाणी पुढे प्रवाहित होत नाही. गटार साफ करतांना संबंधित सफाई कामगार, संबंधित स्वच्छता निरीक्षक यांच्या लक्षात आले नसेल का? पालिका प्रशासनाने या कामाची गुणवत्ता तपासली नसेल का? बिले निघण्या आगोदर संबंधित कामाची नियमावली, निकष, कार्य पद्धत, गुणवत्ता या सर्वांची पायमल्ली झाली असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

-----------

### झेडपी सिईओंनी भेट देताच अधिकारी,

कसलाही विलंब न करता नुतन सिईओ जितीन रहमान यांनी पदभार स्विकारला. पदभार घेताच त्यांनी कामाचा धडाका लावला असून पहिल्याच दिवशी जिल्हा परिषदेच्या सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन आवश्यक त्या सुचना त्यांनी दिल्या. तसेच मंगळवारी सिईओ जितीन रहमान यांनी बीड पंचायत समितीला भेट दिली. यावेळी त्यांचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वागत केले. मात्र शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेत असताना माहिती देताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ झाल्याचे समजते. दरम्यान झेडपी सिईओ यांनी एका शाळेसह गेवराई पंचायत समितीला भेट दिल्याचेही समजते.

**धावत्या भेटी दिल्या तरच अधिकारी, कर्मचारी सरळ होतील**

झेडपीचे सिईओ जितीन रहमान यांनी जिल्ह्यातील जि.प. शाळा, शासकीय रुग्णालयासह सर्व कार्यालयांना अधून-मधून धावत्या भेटी दिल्या तरच अधिकारी आणि कर्मचारी हे सुतासारखे सरळ होतील अन्यथा त्यांच्या कामाच्या पध्दतीने नागरीक सध्या तरी त्रस्त झाले आहेत.

--------------------

### बापाची चिंता मिटली; लाडक्या

येणार आहे. शिवाय आई आणि मुलीच्या संयुक्त बँक खात्यात ही रक्कम जमा होणार असून आतापर्यंत बीड जिल्ह्यातील ३ हजार ६६ मुलींच्या बँक खात्यात पहिल्या हप्त्याची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. पाच टप्प्यात ही रक्कम दिली जाणार असून सध्या लाभार्थ्यांच्या यादीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. महिला व बाल कल्याण विभाग हा अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मदतीने या योजनेची व्याप्ती वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे.

---------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. २५ जून २०२५



## सौ. केएसके कृषी महाविद्यालयाच्या कृषी दुतांचा माती परीक्षणाचा स्तुत्य उपक्रम



बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. के. एस. के. (काकू ) कृषी महाविद्यालय म्हसोबा फाटा बीड येथील कृषीदूतांनी खामगाव या गावात जाऊन तेथील शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व व फायदे समजावून सांगितले, तसेच माती परीक्षण केल्याने जमिनीत व मातीत असलेले घटक समजतात व पुढील पिकासाठी लागणारे खत व मातीत असलेले खतांचे किंवा नत्र, पलाश, पोटॅश यांसारख्या खतांचे प्रमाण समजून येते व पुढील पिकाचे व्यवस्थापन करण्यास मदत होते यासारखे फायदे शेतकऱ्यांना समजावून सांगितले व तेथील शेतकरी मुसा समशेर खान पठाण व जुबेर रहीम खान पठाण यांच्या शेतात जाऊन माती परीक्षणासाठी माती कशी गोळा करावी याबद्दल शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले, यावेळी शेतकऱ्यांना पडलेल्या प्रश्नांचे निवारण देखील कृषिदुतांनी केले.

# एक तरी झाड लाव माणसा.. एक तरी झाड लाव..!

## वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांच्या गीताने डॉ.सोनाजीराव रांजवण विद्यालयात टाळ्या





वडवणी । प्रतिनिधी

**एक तरी झाड लाव माणसा.. एक तरी झाड लाव. झाड मागत नाही काही.. ते सदैव देतच राही... एकीकडे वृक्षतोडीचा सुमार कार्यक्रम प्रशासकीय व्यवस्थेकडून राबविण्यात येत असताना माणसाला जगण्यासाठी झाडांची गरज आहे. त्यामुळे माणसा एक तरी झाड लाव अशी आर्त हाक आपल्या गीतातून वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी देताच डॉक्टर सोनाजीराव रांजवन विद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा एकच कडकडाट केला.**

वडवणी येथील प्रसिद्ध आणि नावाजलेल्या माध्यमिक विद्यालयाचे नामकरण डॉक्टर सोनाजीराव रांजवण विद्यालय असे सोमवारी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंदफणा प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव रांजवण होते तर व्यासपीठावर नगराध्यक्ष शेषराव जगताप, उपनगराध्यक्ष बंन्सीभाऊ मुंडे, बाजार समिती सभापती संभाजी शिंदे, वृक्षमित्र सुधाकर देशमुख, डॉक्टर शंकर वाघ, पत्रकार विनायक जाधव, पत्रकार अशोक निपटे, पत्रकार सतीश मुजमुले, पत्रकार अशोक फपाळ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ सोनाजीराव रांजवण विद्यालयाच्या नाम फलकाचे अनावरण करून मान्यवरांच्या हस्ते शाळेचा नामकरण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी ऐनवेळी वृक्षमित्र सुधाकर देशमुख उपस्थित झाले. बीड परळी राज्य मार्गावर सुरू असलेली सुमार वृक्षतोड ही पोटाला पीळ आणणारी आहे. मागील अनेक वर्षापासून या रस्त्याचं सौंदर्य वाढवणारे आणि निसर्गाचे संगोपन करणारे हे झाडे रस्त्याच्या रुंदीकरणाच्या नावाखाली कापले जात आहेत. मोठमोठे वृक्ष आडवी करून त्याचा नायनाट केला जात आहे. मात्र याला कोणीही विरोध करताना दिसत नाही. निसर्गाचा ऱ्हास होत आहे. ऑक्सिजनची कमतरता भासत आहे. पर्यावरण धोक्यात सापडले आहे. अशाही परिस्थितीत मोठ्या वृक्षाची कत्तल होणे ही पुढील पिढीसाठी धोकादायक बाब आहे. मात्र याकडे शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करत आहे. या बाबीकडे लक्ष वेधून आता माणसा जागा हो आणि तुच एक तरी झाड लाव. हे झाड आपल्याला ऑक्सिजन देणार आहे. आपलं जीवन वाचवणार आहे. हे झाड आपल्याला काहीच मागत नाही तर ते आपल्याला सदैव काही ना काही देत राहतं. अशा पद्धतीचा संदेश आपल्या गीतातून प्रख्यात वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी एकच टाळ्यांचा कडकडाट केला. डॉक्टर सोनाजीराव रांजण यांनी सदैव आपल्या जीवनामध्ये सत्कार्य केलं त्यांच्या सत्कार्याचा विसर कोणीही पडून देऊ नाही असा अनमोल सल्लाही वृक्ष मित्र सुधाकर देशमुख यांनी दिला. वडवणी येथील शिक्षण क्षेत्रामध्ये नामांकित असलेले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला डॉक्टर सोनाजीराव रांजवन बापू यांचे नाव म्हणजे त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय केलेल्या कार्याचा गौरव होय असे पत्रकार अशोक निपटे यांनी यावेळी बोलताना सांगितले. तर शिवाजीभाऊ रांजवन (सिंदफणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष) यांनी बापूंच्या शिक्षण क्षेत्रातील कार्यावर प्रकाश टाकला. भावी काळातही हे विद्यालय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अहोरात्र मेहनत घेईल असे आश्वासन त्यांनी दिले. तर वडवणी नगरपंचायतचे अध्यक्ष शेषराव बापू जगताप आपल्या भाषणामध्ये म्हणाले की बापूंनी वडवणी सारख्या ग्रामीण भागामध्ये शिक्षण संस्था उभारून ग्रामीण भागातील वाड्या रस्त्यावरील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे दालन खुले केले आहे. नगरपंचायत उपाध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे यांनी देखील बापूंचे शिक्षण क्षेत्रातील कार्यांचे कौतुक केले. विद्यालयाचे प्राचार्य वाय बी भोसले यांनी प्रास्ताविकात विद्यालयाचा शिक्षण क्षेत्रातील चढता आलेख उपस्थितांसमोर मांडला, बापूंनी केलेल्या कार्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो त्यांचे या विद्यालयाला नाव दिल्यामुळे आणखीनच आमच्यावर जबाबदारी येऊन पडल्याचे सांगितले आणि ही जबाबदारी पेलण्यासाठी आणि विद्यालयाचे नाव अधिक रोशन करण्यासाठी येथील शिक्षक प्राध्यापक वृंद आणि कर्मचारी समर्थ असल्याचे सांगितले संस्थेचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवन आणि मा. प्रतापरावजी रांजवण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचेही ते म्हणाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य वाया बी भोसले, सांस्कृतिक विभाग प्रमुख बाबासाहेब जाधव, उपप्राचार्य जयदेव लांडे, भागवत बुंदाटे, अविनाश शिंदे, वसंत राठोड, सावंत सर, आत्माराम शिंदे, रघुवीर उजगरे, केशव लंगे आदी शिक्षक वृंद आणि संजय कल्याणकर, सुधाकर लांडे, भारत कटारे आदींनी परिश्रम घेतले.

# सरकारने आरक्षणाचा शब्द पाळावा अन्यथा आंदोलन करणार- हजारे



अंबाजोगाई । प्रतिनिधी

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीला घेऊन मागील आठ ते नऊ महिन्यांपूर्वी लातूर येथे उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा आरोप लावला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ देण्यासाठी तत्कालीन शिंदे सरकारने सकारात्मक प्रतिसाद ही दिला होता. परंतु, फडणवीस सरकार सत्तेवर येवून आता दीडशे दिवस पूर्ण झाले आहेत. तरी परंतु, अद्याप ही याबाबत फडणवीस सरकार याप्रश्नी गंभीर नाही. बहुतेक निवडणुकीत आरक्षण देतो असे सांगून धनगर समाजाची मतं घेऊन सत्तेवर आलेल्या महायुती सरकारला दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला आहे. त्यामुळे महायुती सरकारने दिलेला शब्द पाळून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करीत आरक्षणाचा तिढा संपवावा. अन्यथा अन्यथा धनगर समाज नव्याने आंदोलन करेल असा इशारा धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी राज्य सरकारला दिला आहे.

या प्रश्नी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन, उपोषण करण्यात आली. यात धनगड जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करून धनगड जमातीचे प्रमाणपत्र ही रद्द केली आहेत. त्यानंतर पुढे आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मुद्दा उपस्थित झाला. परंतु, विधानसभा निवडणुक आदर्श आचारसंहिता लागल्याने तो तसाच प्रलंबित राहिला. तरीही धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा मुद्दा सतत लावून धरला होता. महाराष्ट्रात धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा बाजूला पडावा, समाजाला विसर पडावा म्हणून महायुती सरकारने त्यांच्या मर्जीतील धनगर समाजातील काही मोजक्या नेत्यांना लाल दिवा, मंत्री पदाचा दर्जा, सभापतीपद आणि आमदारकी बहाल केली आहे. धनगर समाज आरक्षण आंदोलनाचा फायदा याच मोजक्या धनगर नेत्यांना झाला आहे. संपूर्ण धनगर समाजाला नाही. हे मोजके नेते म्हणजे संपूर्ण धनगर समाज नव्हे असे मल्हार योद्धा चंद्रकांत हजारे यांनी सरकारला ठणकावून सांगितले आहे. जर धनगर आरक्षणाची महाराष्ट्रात अंमलबजावणी केली नाही तर धनगर समाजाला पुन्हा एकदा तीव्र आंदोलन उभे करावे लागेल असा इशारा आंदोलक हजारे यांनी महायुती सरकारला दिला आहे.

# अट्टल गुन्हेगार श्रीकांत ताडेपकर एक वर्षासाठी स्थानबद्ध



जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यात शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवुन दहशत निर्माण करीत असल्याने, त्यांचे विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत चे अधिनियमानुसार स्थानबध्दतेची कारवाई करण्यात येते. श्रीकांत ऊर्फ शिऱ्या त्रऋषीकुमार ताडेपकर रा. सरस्वती मंदीराजवळ, खरपुडी रोड जालना हा सुध्दा तलवार व घातक हत्याराचे जोरावर वेगवेगळे गुन्हे करुन सामाजीक सुव्यवस्था बिघडवत असल्याने, श्री. सुरेश उणवणे (तात्कालीन प्रभारी अधिकारी तालुका जालना) यांनी त्याचा स्थानबध्दतेचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, कार्यालयामार्फत मा. जिल्हादंडाधिकारी, जालना यांचेकडे पाठविला होता.**

मा. जिल्हादंडाधिकारी यांनी श्रीकांत ऊर्फ शिऱ्या त्रऋषीकुमार ताडेपकर याला प्रस्तावास मंजुरी देवून आरोपी श्रीकांत या आरोपीस ०१ वर्षाकरीता मध्यवर्ती कारागृह हर्मुल येथे स्थानबध्द करणे बाबतचे आदेश निर्गमीत केले आहे. चार महिन्यापासुन सदर आरोपी हा त्याचा मोबाईल बदं करुन वेगवेगळ्या ठिकाणी त्याचे अस्तित्व लपवीत होता. वेळोवेळी त्याचा शोध घेवुन सुध्दा तो मिळून येत नव्हता. आज २४ जून रोजी सदर इसम हा एका वाहनात बसुन जालना शहरात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त झाल्याने, त्याचा शोध घेत असतांना, सदर इसम हा पोलीसांना पाहून पळु लागला तेंव्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याचा एक ते दीड कि.मी. पाठलाग करुन त्यांला विशाल कॉर्नर जालना येथुन ताब्यात घेतले आहे. त्यास स्थानबध्दतेच्या कारवाईसाठी पोलीस ठाणे तालुका जालना येथे सुपुर्द करण्यात आले असुन त्यास ०१ वर्षाकरीता हर्सल कारागृह ठेवण्यात येणार आहे.अशा प्रकारचे गुन्हे करुन सामाजीक सुव्यवस्था बिघडविणारे आरोपीविरुध्य . कायद्यातंगत स्थानबध्दतेची तसेच हद्यपारीची कारवाई करण्यात येणार आहे. सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल ,अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सहायक पोलीस निरीक्षक, योगेश उबाळे, पोउपनि. राजेंद्र वाघ, पोउपनि भगवान नरोडे पो.स्टे. अंबड, पोलीस अंमलदार विजय डिक्कर, भाऊराव गायके, रुस्तुम जैवाळ, प्रशांत लॉखंडे, फुलचंद गव्हाणे, संभाजी तनपुरे, रमेश काळे, सोपान क्षीरसागर, सचीन राऊत, योगेश सहाणे, धीरज भोसले सर्व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली

## पान ६ वरून...

### पहाट फाउंडेशनचा राज्यस्तरीय

गरज ओळखुन अँड राज पाटील यांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून संपूर्ण बीड जिल्ह्यातील गावागावांमध्ये झाडांचे महत्त्व सांगत जिजाऊ फिरता जन्म उत्सवा साजरे केला यामध्ये वृक्षांची वाटप करून तेथील नागरिकांना ती झाडे जगविण्याची जिम्मेदारी दिली,मित्रपरिवारांच्या वाढदिवसानिमित्त व महापुरुषांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेणे व रक्तदात्यांना झाडांचे वाटप करणे, मराठा आरक्षण चळवळीमध्येही येणाऱ्या सर्व समाज बांधवांना वृक्षांचे वाटप केले.दर वर्षी संक्रातीला सरपंच सौ अर्चनाताई पाटील व राज पाटील या दाम्पत्याने महिलांना वाण म्हणून पुस्तक व झाडाचे वाटप केले,तालुक्यातील १०८ जि.प. शाळेतील १०,००० हा विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,कोरोना काळात गरजूंना किराणा किट व औषधांचे वाटप,. सांगली, कोल्हापूर महापूर ग्रस्तांना २ ट्रक उपयोगी साहित्य प्रत्यक्षात वाटप, गावातील शेती रस्ते १६ किलोमीटर स्वखर्चातून, तलाव गाळ मुक्त व नद्या खोलीकरण सरळीकरण,गावातील बेरोजगार युवकांना हार्वेस्टर ऑपरेटर ड्रायव्हर या माध्यमातून शंभर पेक्षा जास्त तरुनांना रोजगार उपलब्ध करून दिला.संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये वृक्षमित्र अँड राज पाटील यांनी मोफत लाखो वृक्ष वाटप केली नाही तर ती जगवूनही दाखवली. आपल्या तिगाव जन्मभूमी पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबऊन विविध जलसंधारणाच्या कामे नदी खोलीकरण व रुंदीकरण तलावातील गाळ उपसा करणे, बंधाऱ्याचे खोलीकरण करून जमिनीत पाणी टिकून राहण्यासाठी ताडपत्रीचे आच्छादन करून त्यामध्ये मोठया प्रमाणात पाणीसाठा झाला आहे.त्यामुळे तिगाव हे दुष्काळमुक्त व टँकर मुक्त होण्यास मदत होणार आहे.आदी कामाची दखल पहाट फाउंडेशन संभाजीनगर यांनी घेतली आहे. वृक्षमित्र लढा दुष्काळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राज पाटील यांना पहाट फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार जाहीर केला असून पुरस्कार वितरण सोहळा २८ जून रोजी बुलढाणा येथे होणार आहे. त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन वर्षाव होत आहे.

पहाट फाउंडेशन चा सामाजिक कार्यकर्ता म्हणून पुरस्कार जाहीर झाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे खास विश्वासू आमदार अमितजी गोरखे,माजलगाव मतदार संघांचे आमदार प्रतश दादा सोळंके यांनी अँड राज पाटील यांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

### जाहीर प्रगटन

मा. विशाखा बी. पाटील ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज न ९६६/२०२५

अविद्या भ्र. आश्रुबा पनाळे, वि. निरंक

अर्जदार १. अविद्या भ्र. आश्रुबा पनाळे वयः ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा.मु. मोनगीरवाडी पो. बोरफडी, ता. जि. बीड

विरुध्द

निरंक

गैरअर्जदार :

**मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुनिल अश्रुबा पनाळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सुनिल आश्रुबा पनाळे, यांचा मृत्यु दि. ०८/०१/२०२५ रोजी सरकारी दवाखाना, ता. जि. बीड येथे मयत झाले असून मयत सुनिल आश्रुबा पनाळे हा अर्जदार हिचा मुलगा होता मयतास अर्जदार वगळता यांना अर्जदारा व्यतिरिक्त ईतर कुणीही वारस नाहित.

वरील अर्जदार याना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजार होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुनील आश्रुबा पनाळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०६/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४/०८/२०२५ आहे.

आदेशावरुन
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर . बीड

## पान ६ वरून...

### छत्रपती शिवाजी विद्यालयात

करून त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.आपण ठरवल्यानंतर यश निश्चित मिळते. यावेळी आदर्श मस्के,दिपाली आवाड यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मनोज सोळंके यांनी केले. सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले.यावेळी आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, माधव घोलप, मुरलीधर भाळशंकर,अनंत शेजुळ,अनंत राठोड,दत्तात्रय इंगळे,सय्यद गयास, मिलिंद देशपांडे, फरजाना पठाण, स्मिता डाके,शिल्पा शिनगारे, तुळशीराम साळवे , पंकज कळसकर, ज्ञानेश्वर पवार, प्रथमेश लांडगे, दिनकर काळे,दत्ता पांडे यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### भारतीय बौद्ध महासभेच्या

संस्कार सचिव ,शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे,एन बी राजभोज ,जिल्हा संघटीका शारदाताई तांगडे महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे,महिला तालुका सरचिटणीस कोमलताई डोंगरे,महिला तालुका कोषाध्यक्ष अनुराधाताई साळवे यांच्यासह शहरातील धम्म उपासिका उपस्तीत होत्या या ठिकाणी मान्यवरांकडुन नुतन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या व या निवडी मुळे शहरातील धम्म चळवळ गतीमान होईल आसी आशा व्यक्त करण्यात आली

### शेकापने उपविभागीय

कामगार पक्षाचे नेते भाई अॅड नारायण गोले पाटील यांनी बोलताना सांगितले की,उपविभागीय अधिकारी यांनी रूपामाता गुऱ्हाळाची जप्ती करून त्याचा लिलाव करावा व लिलावाच्या आलेल्या रकमेतून शेतकऱ्यांच्या उसाचे बिले द्यावीत अन्यथा आम्हाला कायदा हातात घेऊन गुराळासह जमिनीचा ताबा घेण्याचा इशारा दिला.या आंदोलनात शेकडो नागरिक व कार्यकर्ते सहभागी झाले होते,या आंदोलनाला पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता तर आंदोलनानंतर उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी आंदोलकांच्या मागण्याचे निवेदन घेऊन संबंधितांनी आठ दिवसात उसाची बिले न दिल्यास कठोर कार्यवाही करण्याबाबत आंदोलकांस आश्वाशित केले.या आंदोलनासाठी शेतकरी कामगार पक्षाचे भावी मुंजा पांचाळ,भाई श्रीराम शेवाळे,भाई सलीम खान पठाण,भाई विष्णू शेळके, जयराम कोरडे, मुक्तीराम कापसे, भाई भास्कर कांबळे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

### जिल्हा कार्यक्रम

केली आहे. यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. प्रभारी कार्यक्रम अधिकारी कालिदास बडे, विस्तार अधिकारी पांडव यांच्यासह अधिकारी कर्मचारी यांनी त्यांचे स्वागत केले.

### चकलांबा पोलिसांची

जणांना पकडले. सदर कारवाईत आरोपींकडून चार मोटरसायकल, सहा मोबाईल व रोख रक्कम ४३,३०० असा एकूण ३ लाख ५८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.चकलांबा पोलिस ठाण्यात याप्रकरणी शहादेव यादव ढोणे राहणार कासरवाडी तालुका गेवराई जिल्हा बीड, रामेश्वर तुळशीराम गाजरे राहणार शेकटा तालुका गेवराई जिल्हा बीड, संपत शंकरराव खेडकर रा चकलांबा ता गेवराई जी बीड, भागवत शिवराम शिरसाट रा तरडगव्हाण ता शिरूर जिल्हा बीड, बदाम हरिभाऊ महानोर रा कसरवाडी ता गेवराई जी बीड, पांडुरंग शेषराव बिचकून चकलंबा ता गेवराई जी बीड अशा ६ जणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, परि पो उप नि पवनसिंग अंबरसिंग जंघाळे, पोशिं २००४ कैलास विठ्ठल खटाणे, पोशिं ८९ किरण सुनील मिसाळ, पोशिं २३१ प्रशांत कल्याण घोंगडे यांनी केली.

### एक पेड माँ के नाम

लोहिया,लंकेश वैद्य, पर्यावरण दूत मेजर एस.पी.कुलकर्णी, मुख्याध्यापक के.बी. नांदगावकर,विभाग प्रमुख श्रीनिवास वैद्य, रविंद्र ठाकूर,व्यंकटेश चामनर,अशोक आखाडे,शिवहर ढगे,प्रियंका बेद्रे, पल्लवी गंगणे आदी उपस्थित होते. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून यातूनच पर्यावरणाचा समतोल राखला जाईल असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. विद्यालयातील शिक्षिका संध्या जोशी,पल्लवी गंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ''झाडे जगवा वसुंधरा वाचवा'' हे पथनाट्य सादर केले. शाळेच्या परिसरात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन अशोक आखाडे तर उपस्थितांचे आभार सचिन अडसूळे यांनी मानले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रमदानातून

डोंगराळ असून नगर परिषदेमार्फत काही वर्षापुर्वी अत्यंसंस्कारासाठी निवारा बांधण्यात आला असून उरलेल्या जागेची स्वच्छता करून पुरेशी वीज,पाणी,आसन व्यवस्था आणि इतर आवश्यक गोष्टीसाठी विविध माध्यमातून प्रयत्न करण्याची गरज आहे - डॉ.गोपाळ चौसाळकर

### चेन स्नॅचिंग करणाऱ्या

व काळी पॅन्ट व पायात पांढऱ्या रंगाचे बुट घातलेले दिसुन आले. मागील ईसम हा काळया रंगाचे जरकीन घातलेला व डोक्यावर पिस्ता रंगाची टोपी घातलेला होती. यातील मागे बसलेल्या ईसमाने फिर्यादी यांचे गळयातील मिनी गंठण वजनी १३ ग्रॅम मागे बसलेल्या ईसमाने ओढून घेवुन गेले यावरुन पो.स्टे. बीड शहर गु.र.नं १००/२०२५ कलम ३०४(२),(५) बी.एन.एस प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. या दाखल गुन्हयांची माहिती पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांना मिळताच त्यांनी सदरील गुन्हयातील आरोपींना अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले. स्थानिक गन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी लागलीचा पथके नेमुन बीड, आहिल्यानगर, छ.संभाजीनगर येथे रवाना केली. पोउपनि महेश विघ्ने यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की सदरचा गुन्हा हा आरोपी नामे सुमीत सुभाष रुपेकर (वय १९ वर्ष रा.सजापुर वाळुज ता.जि. छ.संभाजीनगर), अजय संजय पंडीत (वय २० वर्षे रा.निपाणी वडगाव ता.श्रीरामपूर जि.अहिल्यानगर) यांनी मिळुन केला आहे.व सदरचे दोन्ही आरोपी हे श्रीरामपुर येथे अशोकनगर भागात आहेत. यावरुन श्रीरामपुर येथे जावुन दोन्ही ईसमांना ताब्यात घेतले. सदरचे दोन्ही आरोपीतांनी वर नमुद गुन्हे केले असल्याची कबुली दिली. सदर गुन्हयात गुन्हा करतवेळी वापरण्यात आलेली आरोपी क्रं.०१ याची मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपीतांना पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.ऊर्वरीत मुद्येमालाचा शोध स्था.गु.शा.बीड व पो.स्टे.शिवाजीनगर करत आहेत. सदरची कामगिरी नवनीत काँवत,पोलीस अधिक्षक, बीड, सचीन पांडकर अप्पर पोलीस अधिक्षक बीड, पोनि शिवाजी बंटेवाड,स्थागुशा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, राहुल शिंदे, महेश जोगदंड, राजु पठाण, बप्पासाहेब घोडके, गणेश मराडे यांनी केली आहे.

cmyk



# धाराशिवमध्ये महाबीजचे सोयाबीन बियाणं बोगस निघालं, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट

महाबीजचे बियाणे म्हणजे शेतकऱ्याला विश्वासाची हमी असते. मात्र धाराशिव जिल्ह्यात महाबीजच्या विश्वासाला तडा गेल्याच पाहायला मिळते. सोयाबीन बियाणे न उगवल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्यात त्यामध्ये जवळपास ९०% तक्रारी महाबीजच्या आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर कृषी विभागाकडून पंचनामा करण्यात आला त्यामध्ये बियाण्यात दोष असल्याचा आढळल्याच कृषी विभागाकडून सांगण्यात आले. जिल्हाभरात अनेक शेतकऱ्यांचे बियाण उगवलेलं नाही त्यामुळे दुबार पेरणीचा संकट ओढवलं आहे.

पेरलं पण अंकुर फुटेना- दुबार पेरणीचं संकट

धाराशिव जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी सोयाबीन पेरणी केली. पेरणीनंतर आठवड्यानंतरही अंकुर न फुटल्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रारी नोंदवल्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत कृषी विभागाने विविध गावांमध्ये पंचनामे सुरू केले. पंचनाम्याच्या अहवालातून महाबीजच्या बियाण्यांमध्ये दोष असल्याचं स्पष्ट झालं आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. अनेकांनी कर्ज काढून बियाणं खरेदी केलं होतं. मात्र बियाणं उगवलंच नाही, त्यामुळे दुबार पेरणी करण्याची वेळ आली आहे. यामुळे मजुरी, बियाणं, खते अशा सर्व गोष्टींवर दुहेरी खर्च होणार आहे. शेतकऱ्यांच्या मते, महाबीजसारख्या सरकारी संस्थेच्या बियाण्यावर विश्वास ठेवला तरी असा फसवणुकीचा अनुभव येतोय.





धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, लोहारा आणि उमरगा तालुक्यात साधारण २५ ते ३० तक्रारी या बियाणं उगवलं नसल्याच्या आल्या आहेत. त्यात ९०% बियाणं हे महाबीजच आहे. या तक्रारींची पाहणी केल्यानंतर ही बियाणं सदोष असल्याचं समोर आलं असल्याचं कृषी विभागाचे धाराशिव उपाध्यक्ष यांनी सांगितले. जून महिन्यात पेरणीसाठी समाधानकारक पाऊस झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. धाराशिव मध्ये आत्तापर्यंत ५१ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. मात्र महाबीजचे सोयाबीन उगवले नसल्याच्या तक्रारी अनेक शेतकऱ्यांनी दाखल केल्या आहेत. परिणामी संबंधित शेतकऱ्यांना सुमारे ५० एकरांवर दुबार पेरणीचा खर्च करावा लागणार आहे. मे महिन्यात झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने धाराशिव जिल्ह्यातील ३४ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली होती. जूनच्या सुरुवातीला ही चांगला पाऊस झाला. जिल्ह्याचा खरीपपेरा हा प्रस्तावित क्षेत्राच्या ५१% म्हणजेच तब्बल २ लाख ८६ हजार ६४१ हेक्टर वर झाला आहे. शेतकऱ्यांचा कल सोयाबीन पेरणीवरच होता.

# हूमणी अळीच्या नियंत्रणासाठी 'प्रकाश सापळा'

भारतात, हूमणी अळीचा प्रादुर्भाव विविध पिकांवर आढळतो. यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान सुद्धा होते. या किडीच्या नियंत्रणासाठी पीक लागवड पूर्वी पासून एकात्मिक नियंत्रण उपाय करणे गरजेचे असते. कारण वेगवेगळ्या अवस्थेत या किडी पिकांना नुकसान पोहोचवितात. उभ्या पिकात प्रौढ हूमणी अळीचे नियंत्रण करण्यासाठी 'प्रकाश सापळा' हा सर्वात चांगला उपाय असून अगदी कमी पैशात सहज करता येणारा आहे.

खोड, मुळ्या फस्त करते हूमणी: हूमणी अळीपूर्वीची पतंग ही त्याची प्राथमिक अवस्था असते. खरीप हंगामात ज्यावेळी पाऊस पडत नाही आणि अवर्षणजन्य स्थिती निर्माण होते. त्यावेळी हूमणी अळीचे पतंग जमिनीत अंडी घालतात आणि त्या अंड्यातून निघालेली हूमणी अळी ही खोड व मुळे फस्त करते. त्यामुळे शेतातील उभ्या पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. प्रादुर्भाव जास्त झाल्यास संपूर्ण शेतात वेगवेगळ्या जागी मोठ्या प्रमाणात झाडे वाळून जातात. विशेषत: ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात ह्या किडीमुळे होणारे नुकसान जास्त आढळून येते

प्रकाश सापळ्यांचा वापर करून असे करा नियंत्रण :

शेतकऱ्यांनी लिंबाच्या किंवा बाभळीच्या झाडाखाली संध्याकाळी शेतात प्रकाशासाठी बल्ब लावून त्याखाली पसरट भांड्यात पाणी ठेवून त्यावर ऑइल किंवा रॉकेलसारखे खनिज द्रव्याचा थर पसरावा. त्या प्रकाशामुळे पतंग बल्बकडे आकर्षित होऊन भांड्यातील पाण्यात पडून खनिज द्रव्यामुळे मरतात. या पद्धतीने हूमणी अळीचे नियंत्रण करता येते. अलीकडच्या काळात प्रकाश आणि गंध सापळा यांना एकत्रित करून एक नवीन प्रकाश-फेरोमोन कॉम्बो कीटक सापळा विकसित करण्यात आलेला आहे. हा सापळा पर्यावरणास अनुकूल, असून हूमणी अळीचे नियंत्रण करण्यास कार्यक्षम आहे.



# जाणून घ्या चोर बीटी कापसाची माहिती

विदर्भ, मराठवाड्यात खरीपात मोठ्या प्रमाणात बीटी कापसाची लागवड केली जाते. चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील शेतकरी तेलंगणातील कृषी केंद्रांवर गर्दी करून चोर बीटी कापसाचे वाण खरेदी करतात. तेलंगणाच्या तुलनेत महाराष्ट्रातील बीटी कापूस बियाणे स्वस्त दरात आहे. तरीही शेतकरी अधिक दर देऊन तेलंगणातील कृषी केंद्रातून चोर बीटी कापूस बियाणे खरेदी करीत आहेत. काय आहे या मागचे रहस्य जाणून घेऊ या.

चोर बीटी बियाणे काय आहे?

कपाशीचे चोर बीटी वाण बीजी-३ या नावाने ओळखले जाते. चोर बीटी (बीजी-३) या कापसाच्या वाणाला अद्याप शासनाची परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे शासनाने या बियाण्यांवर बंदी आहे. मात्र तेलंगणातून चोरट्या मार्गाने सदर बियाणे विदर्भ आणि मराठवाड्यात आणली जातात. मागील काही वर्षांपासून शेतकरी कापूस पिकाकडे वळले आहेत. चंद्रपूरमधील सीमावर्ती चामोर्शी, सिरोंचा, मुलचेरा या तालुक्यांमध्ये दरवर्षी कापसाचा पेरा वाढत चालला आहे. कापसाच्या पिकात मोठ्या प्रमाणात गवत उगवत असल्याने गवत काढण्यावर शेतकर्यांना मोठा खर्च करावा लागतो. हा खर्च कमी करण्यासाठी शेतकरी तण नाशकांची मोठ्या प्रमाणात फवारणी करतात.

तण नाशकाची फवारणी केल्यास त्याचा काही प्रमाणात परिणाम संबंधित पिकावरही होतो. मात्र चोर बीटी या कापसाची लागवड केल्यास या पिकावर तणनाशकाचा काहीच परिणाम होत नाही. त्यामुळे चोर बीटी कापसाची लागवड करून मोठ्या प्रमाणात शेतकरी तणनाशकांचा वापर करतात.

चोर बीटी बियाण्यांमुळे होणारे नुकसान

तणनाशकाच्या अति वापरामुळे शेतजमीन पूर्णपणे नापीक होते. तसेच पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण होतो. अतिशय घातक असलेली तणनाशके वापरली जात असल्याने मानवाला कॅन्सर होतो किंवा त्याचा मृत्यू सुध्दा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने चोर बीटी या बियाण्यांवर बंदी घातली आहे. थोड्याशा फायद्यासाठी शेतकरी या वाणाची लागवड करून स्वत:चा आणि कुटुंबियांचा जीव धोक्यात घालत आहेत. यामुळे पर्यावरणाचे सुद्धा नुकसान होत आहे. तेलंगणातही या बियाण्यांवर बंदी आहे. मात्र तेलंगणा राज्यातून प्रतिबंधित बियाणे गडचिरोली, चंद्रपूरसह मराठवाड्यातील काही जिल्ह्यात आणले जात आहेत. या वाणाची चोरून लागवड केली जाते, म्हणूनच कदाचित या वाणाला चोर बीटी कापूस म्हणतात.

बंदी असलेल्या चोर बीटी कपाशी लागवडीला यंदा चाप बसला. मात्र, सीमावर्ती भागातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्राऐवजी तेलंगणातील कृषी केंद्रांतून सर्वाधिक कापूस बियाणे खरेदी केली आहेत. बियाणे खरेदीसाठी येथील शेतकरी तेलंगणातील शिरपूर, आशिफाबाद व कागजनगर येथील कृषी केंद्रांमध्ये जात आहेत. तोहोगाव व लाठी परिसरातील शेतकरी कापूस बियाण्यांसाठी तेलंगणात शेकडो किलोमीटर प्रवास करीत आहेत. तेथील विक्रेते दुसर्या शेतकर्यांच्या नावावर बिल फाडत असल्याने बियाणे उगवले नाही तर भरपाईपासून मुकावे लागणार आहे. गोंडपिपरी तालुक्यात कुठलाही उद्योग नाही. केवळ शेतीवरच उदरनिर्वाह चालतो. मात्र कधी नैसर्गिक, तर कधी सुलतानी संकटाचा सामना येथील शेतकऱ्यांना करावा लागतो. बहुतांश शेती नदीकाठावर असल्याने दरवर्षी पुराचा धोका असतो. या भागातील शेतकरी बंदी असलेले चोर बीटी बियाणे लागवड करीत होते. मात्र, हे बियाणे आता विश्वासाचे राहिले नाही. त्यामुळे शेतकरी वैध बियाण्यांकडे वळले आहेत. इतर शेतकर्यांनीही यातून धडा घेऊन मान्यता प्राप्त बियाणे खरेदी करूनच लागवड करावी.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२६० : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे पहिले सुलतान कुतुबुद्दीन ऐबक यांचा तत्कालीन भारतातील लाहोर या प्रांतात राज्याभिषेक करण्यात आला.
१४४१ : इटन कॉलेजची स्थापना.
१५७१ : मिगेल लोपेझ दि लेगाझ्पीने मनिला शहराची स्थापना केली.
१७९३ : फ्रान्समधील पपहिल्या प्रजासत्ताक घटनेचा अवलंब केला गेला.
१८८० : ओ कॅनडाचे हे गाणे कॅनडाचे राष्ट्रगीत म्हणून पहिल्यांदा गायले गेले.
१९३९ : सयामचे थायलँड असे नामकरण करण्यात आले.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्स व इटलीमधे शस्त्रसंधी झाली.
१९६१ : भारतात निर्मित स्वदेशी एच. एफ २४ सुपर सोनिक लढाऊ विमानाणे भरारी घेतली.
१९६६ : मुंबईहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एयर इंडियाच्या विमान स्वित्झर्लंड देशांतील माउंट ब्लांकमध्ये दुर्घटनाग्रस्त झाल्यामुळे ११७ नागरिक ठार झाले.
१९८२ : कर्नाटकातील सर्व शाळांत कन्नड भाषा शिकविण्याची सक्ती करण्यात आली.
१९९६ : मायकेल जॉन्सनचा १९.६६ सेकंदांत २०० मीटर धावून विश्वविक्रम.
१९९८ : अभिनेते चंद्रकांत मांडरे यांना अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचा 'चित्रभूषण पुरस्कार' जाहीर
२००१ : 'आय. एन. एस. विराट' ही भारतीय नौदलाची एकमेव विमानवाहू नौका आधुनिकीकरणानंतर पुन्हा नौदलात दाखल झाली.
२००४ : न्यू यॉर्क राज्यात मृत्युदंड असंवैधानिक ठरवण्यात आला.
२०१० : जुलिया गिलार्ड यांनी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन इतिहासाचार्य इतिहासकार, अभ्यासक, लेखक, भाष्यकार आणि वक्ते विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्मदिन.
१८६२ : रविकिरण मंडळाचे संस्थापक श्रीधर बाळकृष्ण रानडे यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८६९ : दामोदर हरी चाफेकर चार्ल्स रँड याची हत्या करणारे (मृत्यू: १८ एप्रिल १८९८)
१८९२ : श्रीधर बाळकृष्ण रानडे रविकिरण मंडळाचे संस्थापक (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८९७ : पण्डित ओंकारनाथ ठाकूर ऊर्फ 'प्रणव रंग' गायक व संगीत अभ्यासक, १९५५ मधे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित (मृत्यू: २९ डिसेंबर १९६७)
१८९३ : द वॉल्ट डिस्नी कंपनी चे सह-संस्थापक रॉय ओ. डिस्नी यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९७१)
१८९९ : मर्दानी रुप, तिन्ही सप्तकांतुन सहजपणे फिरणारा आवाज या देणग्या लाभलेले व गंधर्वयुगाची स्मृती जागवणारे नटवर्य गोपाळ गोविंद ऊर्फ नानासाहेब फाटक यांचा जन्म (मृत्यू: ८ एप्रिल १९७४)
१९०८ : गुरू गोपीनाथ कथकली नर्तक (मृत्यू: ९ आक्टोबर १९८७)
१९२७ : तामिळ लेखक कवियरासू कन्नडासन यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९८१)
१९२८ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (मृत्यू: १७ जुलै २०१२)
१९३७ : ज्येष्ठ लेखिका अनिता मुजूमदार देसाई यांचा मसुरी येथे जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५४ : भारतीय इतिहास कालखंडातील प्रसिद्ध वीरांगना गोंडवाना राज्याच्या राज्यकर्त्या राणी दुर्गावती यांचे निधन.
१८८१ : हिंदू मठाधिपती, समाजसुधारक व लेखक तसचं, आधुनिक पंजाबी गद्याचे जनक पंडित श्रद्धाराम शर्मा यांचे निधन.
१९०८ : अमेरिकन राजकारणी व अमेरिकेचे माजी अध्यक्ष स्टीफन ग्रोव्हर क्लेव्हलँड यांचे निधन. अमेरिकन इतिहासातील एकमेव राष्ट्रपती होते ज्यांनी राष्ट्रपती पदाचा सलग दोनवेळा कारभार सांभाळला.
१९१४ : वासुदेव गणेश टेंबे उर्फ टेंबे स्वामी किंवा वासुदेवानंद सरस्वती यांचा गरुडेश्वर, बडोदा, गुजरात येथे निधन. (तारखेप्रमाणे)
१९४७ : बौद्ध धर्माचे अभ्यासक पंडित धर्मानंद कोसंबी यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)
१९८० : स्वतंत्र भारताचे चोथे राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटा गिरी उर्फ वी. वी. गिरी यांचे निधन.
१९९७ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (जन्म: २४ ऑगस्ट १९४४)
२०१३ : इटलीचे वे४० पंतप्रधान एमिलियो कोलंबो यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १९२०)

# पेरणीपूर्वी करा बियाणे उगवणक्षमता तपासणी

शेतकऱ्यांना हंगाम सुरू होतेवेळी बियाण्यांची उपलब्धता, बियाण्यांची शुद्धता, भेसळ, उगवणक्षमता अशा बियाण्यांशी निगडित अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जर घरचे किंवा अन्य शेतकऱ्यांचे बियाणे वापरणार असेल, तर त्याची उगवणक्षमता तपासून घेणे गरजेचे असते, अन्यथा दुबार पेरणीसारख्या संकटालाही सामोरे जावे लागू शकते. पेरणीपूर्व जर बियाण्याची उगवणक्षमता तपासली तर अशा गोष्टी टाळता येऊ शकतात.

उगवणक्षमता कशी तपासावी? : उगवणक्षमता तपासणीसाठी बियाण्यांतून त्या संपूर्ण बियाण्यांचा प्रातिनिधिक स्वरूपाचा नमुना काढावा. त्याकरिता प्रत्येक पोत्यामधून खोलवर हात घालून मूठभर बियाणे काढावे. सर्व पोत्यांतील काढलेले बियाणे व्यवस्थित एकत्र करावे. त्यातून प्रातिनिधिक नमुना घ्यावा. या नमुन्यातून तपासणीकरिता ४०० दाणे न निवडता सरसकट घ्यावेत. १०० - १०० दाण्यांचा एक याप्रमाणे ४ भाग करावेत. अचूक उगवणक्षमतेसाठी जास्त दाणे घेणे कधीही चांगले.पेरणीची हंगाम सुरू असताना शेतकऱ्यांना प्रत्येकवेळी प्रयोगशाळेत जाऊन उगवणक्षमता तपासणी करणे शक्य नसते. अशा घरगुती साधनांतून उगवणक्षमता तपासणीच्या काही सोप्या पद्धती वापरता येतात.

घरगुती पद्धती : कागदामध्ये बियाणे घेऊन उगवणक्षमता तपासणी : उगवणक्षमता तपासणीचे दोन कागद ओले करून घ्यावे. ओल्या केलेल्या दोन कागदांच्या मध्ये १०० बिया १० ओळींत समान अंतरावर ठेवून घ्याव्यात. कागदाची गोल गुंडाळी करून घ्यावी. दोन्ही बाजूंनी रबर लावावे. प्रत्येकी १०० बिया या प्रमाणे कागदाच्या ४ गुंडाळ्या करून घ्याव्यात. त्यातील ओलावा टिकून राहील, याची काळजी घ्यावी.

रेती/ मातीमध्ये उगवणक्षमता तपासणी : ४ कुंड्यांमध्ये किंवा प्लॅस्टिक ट्रेमध्ये बारीक रेती किंवा ज्या शेतात पेरणी करावयाची आहे तेथील माती भरावी. त्यास हलके पाणी द्यावे. दुसऱ्या दिवशी चारही कुंड्यांमध्ये किंवा ट्रेमध्ये प्रत्येकी १०० बिया १ ते २ सें. मी. खोलीवर लावाव्यात. मातीतील किंवा रेतीतील ओलावा टिकून ठेवावा. परंतु जास्त पाणी होणार नाही याची काळजीही घ्यावी. गोणपाटाच्या तुकड्याचाही वापर उगवणक्षमता तपासणीसाठी करता येतो. त्याकरिता आयताकृती आकाराचा साधारणतः १ फूट १.५ फूट आकाराचा गोणपाटाचा तुकडा घेऊन तो ओला करून घ्यावा. त्यावर १०० बिया १० ओळींत समान अंतरावर ठेवाव्यात. बियाण्यासहित गोणपाटाची गुंडाळी करून घ्यावी. अशा ४ गोणपाटांच्या गुंडाळ्या करून घ्याव्यात. ओलावा टिकवून ठेवावा, परंतु जास्त पाणी होणार नाही याची काळजी घ्यावी. वरील पैकी कोणतीही पद्धत वापरली तरी साधारणतः ८ ते १० दिवसांत बियाण्यांची उगवण होते. आपण ठेवलेल्या बियाण्यांपैकी कितीला कोंब निघाले आहेत, हे मोजावेत. विकृत रोपे, सडलेले बी, कठीण व टणक बी मोजणीत घेऊ नये. चारही नमुन्यांची सरासरी काढून उगवणक्षमतेची टक्केवारी काढावी. ही टक्केवारी आपल्याला सरासरी उगवणक्षमतेचा अंदाज देते.बियाण्याची उगवणक्षमता प्रमाणित केलेल्या उगवणक्षमतेपेक्षा अधिक असेल तर ते बियाणे पेरणीस योग्य असते. प्रमाणित उगवणक्षमतेपेक्षा ५-८ टक्के उगवणक्षमता कमी असल्यास एकरी बियाण्यात १० टक्क्यांनी वाढ करावी. परंतु उगवणक्षमता फारच कमी असल्यास तर असे बियाणे पेरणीसाठी वापरू नये.




# बीडकरांना डीपीसीच्या ५७५ कोटींचे निव्वळ गाजर दाखवले

## पालकमंत्री अजितदादांचा दुटप्पीपणा : नियोजन निधी पुण्याला वाटप करून खर्चही झाला ;बीडला न्याय देता येत नसेल तर पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा

बीड। प्रतिनिधी

नियोजनाच्या निधीकडे राज्यातील सर्वच जिल्ह्यांच्या नजरा लागलेल्या असताना लाडकी बहिण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीला चांगलाच फटका बसला असुन जिल्हा वार्षिक योजना अर्थातच डीपीसीला ३ महिन्यांपासून निधी देण्यात आलेला नाही. सर्वच जिल्ह्यांच्या वार्षिक योजनेच्या तिजोरीत खडखडाट असुन त्याचा परीणाम जिल्ह्यातील विकासकामांवर झाला आहे. बीडमध्ये महिनाभरापूर्वी अर्थमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी आढावा बैठक घेऊन चालु वर्षांतील सन २०२५-२६ या नव्या वर्षातील विकास कामांसाठी ५७५ कोटींच्या कामांची घोषणा केली.मात्र निधीअभावी अद्याप शासनाकडून एकही रुपयांचा निधी वर्ग झालेला नाही. त्यामुळे बीडकरांना केवळ ५७५ कोटींचे गाजर दाखवण्यात आले असल्याची प्रतिक्रिया उमटत असतानाच दुसरीकडे मात्र पुणे जिल्ह्याला नियोजनाच्या निधीतून ३ कोटी २० लाख रुपये वर्ग करून त्यातले १ कोटी १६ लाख रूपये खर्चही झाले आहेत. त्यामुळे पुणे आणि बीड दोन जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या अजितदादांचा दुटप्पीपणा त्यांच्या सारख्या माणसाला शोभत नसुन नाव मोठे आणि लक्षण खोटे या म्हणीप्रमाणे अजितदादांची वागणुक असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली असुन बीडकरांना न्याय देता येत नसेल तर अजितदादांनी पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.





जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका,नगरपंचायती, नावीन्यपूर्ण योजनांसाठी सर्व शासकीय विभागांना जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी वितरित केला जातो.जिल्हा वार्षिक योजनेतून हा निधी खर्च होतो.सन २०२४-२५ या आर्थिक वर्ष अखेरपर्यंत जिल्ह्यासाठी शासनाकडुन आलेला सर्व मंजुर निधी समित्यांमार्फत खर्च करण्यात आला आहे.३१ मार्चला सर्व कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.त्यानंतर मात्र गेल्या ३ महिन्यात म्हणजेच सन २०२५-२६ या नव्या आर्थिक वर्षातील विकास कामांसाठी शासनाकडून १ रूपयाचाही निधी वर्ग झालेला नाही.त्यामुळे नियोजन समितीत कमालीची अशांतता आहे. अजितदादा पवार हे पुणे आणि बीड दोन जिल्ह्याचे पालकमंत्री असले तरी नियोजनच्या निधी वाटपात दुजाभाव केल्याचे दिसून येत आहे.पुणे जिल्ह्याला नियोजनच्या निधीतुन पहिला हप्ता ३ कोटी २० लाख वर्ग झालेला असुन त्यातले १ कोटी १६ लाख रूपये खर्चही झाले आहेत. अजितदादा पवार बीडचेही पालकमंत्री असले तरी बीडच्या खात्यावर शुन्यच अद्याप कायम असुन पुणे जिल्ह्याला नियोजन समितीच्या निधीचा ३ कोटी २० लाख रुपये वर्ग झालेला निधी तातडीच्या खरेदीसाठी होता असंही नाही तर नियोजन समिती सक्षमीकरण या हेडखाली त्यातील १ कोटी १६ लाख खर्चही झाले आहेत.याचवेळी बीड जिल्ह्यातील जलजीवन सारख्या महत्वाच्या योजनेतील ५०५ कामांचे तब्बल १३२ कोटी रुपये सुद्धा अजितदादा पवार वेळेवर देत नसल्याने जर अजितदादांना बीडला न्याय देता येत नसेल तर त्यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# पावसाने ओढ दिल्याने दुबार पेरणीचे संकट

### ढगाळ वातावरणामुळे जोमात आलेले कोबी पिक रोगांच्या प्रादुर्भावामुळे संकटात



लिंबागणेश। प्रतिनिधी

यावर्षी मे महिन्यात अवकाळी आणि मान्सुनपुर्व पावसाने लघु प्रकल्प ओव्हरफ्लो झाले आहेत.चांगल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी वाफसा होताच समाधान कारक पाऊस झाल्याने कापुस लागवडीसह तुर,मका, सोयाबीन, खरीप पिकांची पेरणी जोमात झाली.मात्र मागील १५ दिवसांपासून सतत वाढत असलेले तापमान आणि जोरदार वाऱ्यामुळे जमिनीतील ओलावा लवकर आटुन गेला आहे.कोरड्या हवामानामुळे पिकांचे कोवळे अंकुर उन्हाच्या झळांनी जळुन जाण्याच्या स्थितीत आहेत.अनेक ठिकाणी पिके कोमेजु लागल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. वेळेत पाऊस न झाल्यास पिकांचे नुकसान अनिवार्य असुन परीणामी दुबार पेरणीचे संकट उभे राहिले असुन त्यासाठीचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांना परवडणार नाही. यातच सध्याच्या ढगाळ वातावरणामुळे कोबी सारख्या जोमात आलेल्या पालेभाज्यांवर करपा,मावा,अळी आणि ईतर किडींमुळे कोबीच्या पानांमध्ये छिद्र पडणे,काळे डाग येणे आदी बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

दोन एकर शेतीमध्ये उंदडवडगाव येथील प्रगतिशील शेतकरी दत्ता जाधव यांच्या नर्सरीतुन ६० हजार रोपांची लागवड केली. खते, औषध फवारणी आदी एकुण १ लाख रुपयांचा खर्च आला. कोबीचे पिक जोमात आल्याने अंदाजे ६-७ लाख रुपये उत्पन्न अपेक्षित आहे.परंतु गेल्या ४-५ दिवसांपासून ढगाळ वातावरण आणि पावसाची सततची भुर भुर यामुळे कोबी पिकांवर करपा,मावा,कीडींमुळे कोबीच्या पानांमध्ये छिद्र पडणे, काळे डाग आदी बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने पदरात किती पडतंय याबद्दल शंका असल्याचे लिंबागणेश येथील कोबी उत्पादक शेतकरी गणपत तागड यांनी बोलुन दाखवले. बीड जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाकडून ८ लाख ८ हजार ९४६ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरण्या प्रस्तावित आहेत. १६जून अखेरपर्यंत या क्षेत्रापैकी ३ लाख ८९ हजार ४४८ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या असून आता जवळपास चार लाख हेक्टर पर्यंत पेरण्या पूर्ण झाल्याचा अंदाज आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ४८.१४ टक्के पेरण्या उरकल्या आहेत. मात्र पेरण्या होताच १५ दिवसांपासून पावसाने हुलकावणी दिल्याने दुबार पेरणीचे ढग दिसू लागल्याने पेरणी झालेल्या आणि पेरणी न झालेल्या शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागलेले आहेत. अस्मानी संकट ओढावल्याने शेतकरी चिंताग्रस्त असताना सरकारचे मात्र शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष असल्याचे आढळून येत असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली.

# जिल्हा रुग्णालयातील तक्रारींसाठी जिल्हा शल्यचिकित्सकांनी बारकोड सिस्टीम चालू करावी-कदम

बीड। प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयात जिल्हाभरातून गरजवंत गोर-गरीब नागरिक उपचारासाठी येतात परंतू त्यांची या ना त्या कारणाने सतत हेळसांड होते त्यामुळे बहुतांश रुग्णांना योग्य तो उपचार मिळत नाही तसेच इमर्जन्सी वॉर्ड मध्ये कोणते डॉक्टर्स सेवेत आहेत त्या डॉक्टरांची नावे चौकशी कक्षाच्या बाहेर ठळक अक्षरात लावण्यात यावेत व त्याचबरोबर रुग्णालयाच्या साफसफाईची सुद्धा दखल घेण्यात यावी साफसफाई कर्मचार्यांना ड्रेस कोड,आयडेंटी कार्ड आणि सोबतच डॉक्टर्स नर्स-ब्रदर्स यांना बंधनकारक करण्यात यावेत अशी मागणी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम आणि ऋषीकेश गिराम यांनी निवेदनाद्वारे जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे केली आहे.

पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीडच्या पोलीस अधिक्षकांनी ज्या पद्धतीने बारकोड ची सिस्टीम चालू केली आहे त्याच पद्धतीने जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत यांनी बारकोड सिस्टीम चालू करावी. कारण की प्रत्येक रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक सरकारी दवाखान्यातील तक्रारी नेमक्या करायचा कुणाकडे या संभ्रमात असतात तसेच प्रत्येक जण शल्य चिकित्सकांकडे जाऊ शकत नाही किंवा तक्रारी मांडू शकत नाही किंवा अधिकार्यांना त्यावेळेस वेळ मिळत नाही त्यामुळे रुग्णांच्या किंवा रुग्णांच्या नातेवाईक यांना बारकोड सिस्टीम अत्यंत उपयोगी पडेल डॉक्टर आणि रुग्ण यांच्यासाठी सोयीस्कर होईल.तसेच मागील काही महिन्यांपासून बीडचा जिल्हा रुग्णालयात या सर्व अटींचे उल्लंघन करत डॉक्टर मनमानी करताना दिसत आहेत याचे रुग्णांवर झालेले परिणाम सर्व वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित सुद्धा झालेले आहे डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसल्याने व वेळेवर रुग्णांना उपचार न मिळाल्यामुळे शेकडो रुग्णांना आपला प्राण गमवावा लागला तसेच तात्काळ उपचाराची गरज असताना डॉक्टर स्वतःची खाजगी दवाखान्यातील प्रॅक्टिस करण्यात व्यस्त असतात फोन न उचलणे फोन बंद करून ठेवणे शिकवू डॉक्टरांना रुग्णांची तपासणी करायला सांगून टाळाटाळ करणे बाहेरगावी आहे असं सांगणे रजेवर आहे असे सांगणे या अशा डॉक्टरांना निलंबित करून कायमचे त्यांच्या खाजगी दवाखान्यात बसवण्याची मागणी मनसेकडून करण्यात आली आहे आणि इमर्जन्सी वॉर्ड मध्ये कोणते डॉक्टर्स सेवेत आहेत त्या डॉक्टरांची नावे चौकशी कक्षाच्या बाहेर ठळक अक्षरात लावण्यात यावेत व त्याचबरोबर रुग्णालयाच्या साफसफाईची सुद्धा दखल घेण्यात यावी साफसफाई कर्मचार्यांना ड्रेस कोड आयडेंटी कार्ड आणि सोबतच डॉक्टर्स-नर्स-ब्रदर्स यांना देखील ड्रेस कोड व आयडेंटी कार्ड हे कंपल्सरी करण्यात यावेत जेणेकरून दलाली करणार्या लोकांकडे लक्ष ठेवण्यास सोपे जाईल असे निवेदनात म्हटले आहे या बाबींची दखल घेवून निश्चितपणे लवकरात लवकर चौकशी करून व रुग्णांसाठी डॉक्टरांसाठी सोयीस्कर असलेल्या गोष्टींचा विचार करून त्या अमलात आणण्याचा नक्कीच प्रयत्न करू असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी दिले आहे.



# खोटे पीकपेरा बनावट सातबारा मुळे १ कोटींचा शासनाला लावला चुना

जालना। प्रतिनिधी

भोकरदनच्या जानेफळ गायकवाड या गावात खोटे पीकपेरा व बनावट सातबारा मुळे शासनाला लावला १ कोटींचा चुना भोकरदन तालुक्यातील जानेफळ गायकवाड गावात बनावट सातबारा आणि खोटे पीक पेरा दाखवत शासनाच्या अनुदान व पीकविमा योजनांमध्ये तब्बल १ कोटी २ लाख ३९ हजार रुपयांचा गैरवापर झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणामुळे भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघात एकच खळबळ उडाली असून कृषी व पणन विभागाने याची गंभीर दखल घेतली आहे.या प्रकरणात आरोपींनी खोटे सातबारा तयार करून त्यावर २०९३ क्विंटल जास्तीची सोयाबीन पीक पेरा नोंदवली, त्याआधारे शासनाकडून मोठ्या प्रमाणावर अनुदान व पीकविमा मिळवला आणि त्याचाच वापर करून बनावट उत्पादन विक्रीचे दस्तावेज सादर केले. या बनावट नोंदींच्या आधारे सोयाबीनची विक्री दाखवून राज्य शासनाची आर्थिक फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी जालना जिल्ह्याचे प्रभारी जिल्हा पणन अधिकारी विजय राठोड यांनी पारध पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्या आधारे पुढील आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे भागवत सुदाम दौड,सुनिल शिवाजी शिंदे, अनिल शिवाजी घुले, सुरेश कैलास सोनवणे, रमेश ठकुबा गायकवाड,कृष्णा साईनाथ गायकवाड, गोपीनाथ कौतीक दौड, सचिन भगवान दौड, कृष्णा सुभाष आन्वेकर (सर्व रा. जानेफळ गायकवाड, ता. भोकरदन, जि. जालना)पवन वाघ (पूर्ण नाव अज्ञात), रा. वरुड बु., ता. भोकरदन, सदर प्रकरणाचा तपास सपोनि एस.डी. माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार, शासनाच्या अनुदानाची रक्कम आणि शेतमाल विक्रीच्या दाखल्यांची चौकशी अधिक खोलवर सुरू आहे.या प्रकारामुळे शासन यंत्रणा सतर्क झाली असून, इतर ठिकाणीही अशा प्रकारच्या बनावट नोंदींचा तपासणी लवकरच करण्यात येणार आहे.

# मस्त्योदरी विद्यालय येथे योगा दिन

अंबड । प्रतिनिधी

लोणार भायगाव (ता.अंबड)येथे जागतीक योग दिन साजरा करण्यात आला सकाळी शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेण्यात आली,योगाचे महत्व त्यांना सांगण्याचे काम योग शिक्षक बाळासाहेब डहाळे यांनी केले.यावेळी मुलांकडून योगा करून घेण्याचे काम श्री विलास पवार यांनी केले.

यावेळी मुख्याध्यापक केशव अटकर, शाळेतील ज्येष्ठ शिक्षक -- रतनसिंग चरावंडे,रमेश तिकांडे यांचे सह डी एन शेळके, सैफ रऊफ शेख आणि शाळेतील शिक्षिका - सविता सानप यांचेसह लिपिक दिलीप पैठने, कर्मचारी सुखदेव लबडे, पांडुरंग बोडखे यांनी देखील योगप्रसिक्षणात सहभाग घेतलाआज मस्त्योदरी विद्यालय लोणार भायगाव येथे जागतीक योग दिन साजरा करण्यात आला सकाळी शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेण्यात आली,योगाचे महत्व त्यांना सांगण्याचे काम योग शिक्षक बाळासाहेब डहाळे यांनी केले. यावेळी मुलांकडून योगा करून घेण्याचे काम श्री विलास पवार यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक केशव अटकर, शाळेतील ज्येष्ठ शिक्षक रतनसिंग चरावंडे,रमेश तिकांडे यांचे सह डी एन शेळके, सैफ रऊफ शेख आणि शाळेतील शिक्षिका - सविता सानप यांचेसह लिपिक दिलीप पैठने, कर्मचारी सुखदेव लबडे, पांडुरंग बोडखे यांनी देखील योग प्रसिक्षणात सहभाग घेतला.




जाहिर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ७ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज न ९६६/२०२५**

**अविद्या भ्र. आश्रुबा पनाळे, वि. निरंक**

अर्जदार १. अविद्या भ्र. आश्रुबा पनाळे वयः ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा.मु. मोनगीरवाडी पो. बोरफडी, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

गैरअर्जदार : मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुनिल अश्रुबा पनाळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सुनिल आश्रुबा पनाळे, यांचा मृत्यु दि. ०८/०१/२०२५ रोजी सरकारी दवाखाना, ता. जि. बीड येथे मयत झाले असून मयत सुनिल आश्रुबा पनाळे हा अर्जदार हिचा मुलगा होता मयतास अर्जदार वगळता यांना अर्जदारा व्यतिरिक्त ईतर कुणीही वारस नाहित.

वरील अर्जदार याना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजार होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुनील आश्रुबा पनाळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २१/०६/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४/०८/२०२५ आहे.**

आदेशावरुन
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर . बीड

स्वाक्षरीत
**क. लिपीक**

शिक्का



जाहिर प्रगटन

**मा. श्री.व्ही.सी. जोशी ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ९३७/२०२५**

**मार्फत ॲड.जी.एस. घुगे**

**आश्रुबा साहेबराव पानाळे वि. निरंक**

ज्यापेक्षा निलावती साहेबराव पनाळे या दिनांक २६.१२.२०२३ रोजी मोनगीरवाडी ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार १)आश्रुबा पि. साहेबराव पनाळे, वय-६० वर्षे, धंदा शेती सध्या निरंक, रा. मोनगीरवाडी, पो. बोरफडी ता.जि.बीड.२) सखुबाई भ्र. बंडु जाधव, वय ४५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. मोनगीरवाडी, पो. बोरफडी ता.जि.बीड.

अर्जदार क १ हे मयत नामे निलावती साहेबराव पनाळे, यांचा मुलगा असुन अर्जदार क्र .२ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे पती हे या पुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याने तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीन कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत निलावती साहेबराव पनाळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ३१/०७/२०२५ आहे.**

**आज दिनांक १९ जुन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.**

आदेशावरुन
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर . बीड

स्वाक्षरीत
**क. लिपीक**


शिक्का


# अबू आजमी यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायदे अंतर्गत गुन्हा दाखल करा-आ.बबनराव लोणीकर

जालना। प्रतिनिधी

वारीमुळे लोकांना त्रास होतो हे अबू आझमी यांचे वक्तव्य मानसिक संतुलन बिघडलेल्या व्यक्तीसारखे असून नक्कीच अबू आझमी यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. त्यांना महाराष्ट्रातील शांतता भंग करायची आहे का? दंगली पेटवायचे आहेत का? असेच त्यांच्या वक्तव्यावरून वारंवार दिसून येते त्यामुळे अशा मानसिक संतुलन बिघडलेल्या आणि महाराष्ट्राची शांतता भंग करू पाहणाऱ्या अबू आजमी यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

वारीला ७०० वर्षाची परंपरा आहे, वारीमध्ये अठरापगड जातीचे लोक एकमेकांना माऊली म्हणत आदरानं सन्मानाने विठूरायाच्या दर्शनाला जातात. छत्रपती संभाजी राजांच्या काळात वारीला तत्कालीन मुस्लिम शासकाकडून त्रास होत होता म्हणून स्वतः संभाजी राजांनी संरक्षण दिलं होत. वारी वर्षभरातून एकदा असते, वारी हे राष्ट्रीय एकात्मतेचे आणि सामाजिक समतेचे प्रतीक आहे ही बाब अबू आझमी यांच्या आयुष्यभर लक्षात आली नाही आणि येणारही नाही त्यांना केवळ औरंगजेबाचे तूष्टीकरण करायचे आहे परंतु ज्या औरंगजेबाच्या तूष्टिकरण अबू आजमी करत असतात त्या औरंगजेबाला छत्रपती संभाजी राजांनी याच महाराष्ट्राच्या मातीमध्ये गाडलं आहे हा इतिहास अबू आजमी विसरले आहेत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.वारीमध्ये गरीब श्रीमंत लहान-मोठा असा कुठलाही भेदभाव वारीत नाही, ७० - ८० वर्षाच्या म्हाताऱ्या माणसापासून उच्चशिक्षित लोकांपर्यंत सर्वजण वारीत सहभागी होतात. महाराष्ट्रातील महाराष्ट्र बाहेरील व जगभरातील लोक वारी काय आहे हे समजून घेण्यासाठी वारीत सहभागी होतात. सर्व जाती धर्माचे लोक वारीमध्ये सहभागी होतात त्यात थोड्याफार प्रमाणात का होईना परंतु मुस्लिम बांधवांचा देखील सहभाग असतो. जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्य अबू आजमी सातत्याने करत असतात. ज्या वारकऱ्यांमुळे कुणालाही त्रास होत नाही, जे वारकरी स्वतः त्रास सहन करत विठुरायाच्या दर्शनाची आस मनात ठेवून पंढरपूरला जातात त्यांच्याबद्दल अशी गरळ ओकण्याचा धंदा केवळ अबू आजमीच करू शकतात, असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले. जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्य वारीच्या निमित्ताने करणाऱ्या अबू आझमी यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायदे अंतर्गत गुन्हा दाखल करावा तसेच अबू आजमी यांनी तमाम वारकऱ्यांची माफी मागावी. वारीसाठी महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र दिंडी मार्ग तयार केला आहे त्यामुळे वारीचा त्रास होण्याचा प्रश्न येत नाही. वारीमध्ये पोलिसांवर कोणताही ताण पडत नाही, वारीमध्ये महिला पोलिसांना कुठलाही त्रास होत नाही, हे औरंगजेबि विचाराच्या अबू आजमी ला कधीच कळणार नाही. सामाजिक तेढ निर्माण करून जर वारीमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडला तर त्याला सर्वस्वी जबाबदार असेल असेही आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.



राज्य लोकतंत्र बुधवार, दि.२५ जुन २०२५ 

# आ. संदीप क्षीरसागर यांनी यांनी घेतली चौसाळा जि.प. गटाची बैठक

## वानगाव येथे आमदार आपल्या दारी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

**नागरिकांच्या शासकीय कामातील अडचणी सोडवण्यासाठी आणि सामान्य नागरिकांशी संवाद साधण्यसाठी प्रशासकीय विभागांसोबत बीड तालुक्यातील चौसाळा जिल्हा परिषद गटातील गावांची वानगाव येथे मंगळवारी (दि.२४) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी आमदार आपल्या दारी या विशेष मोहीमेअंतर्गत बैठक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात स्थानिक नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यावर भर देण्यात आला.या कार्यक्रमादरम्यान, श्रावण बाळ आणि संजय गांधी निराधार योजनेच्या मंजूरी पत्रांचेही प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले.**



या कार्यक्रमात आ.संदीप क्षीरसागर यांनी चौसाळा जिल्हा परिषद गटातील नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि तात्काळ निराकरणासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. आमदार आपल्या दारी ही संकल्पना गावागावांतील लोकांच्या समस्या थेट त्यांच्या दारी जाऊन सोडवण्यासाठी आणि लोकांशी संवाद साधण्यासाठी असून शासकीय योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवणे आणि प्रशासकीय प्रक्रियांमधील अडथळे दूर करणे हा आमचा मुख्य उद्देश असल्याचे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. या उपक्रमाला चौसाळा जिल्हा परिषद गटातील सर्वसामान्य लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, अशा प्रकारच्या मोहिमांमुळे शासकीय योजनांचा लाभ थेट लोकांपर्यंत पोहोचत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह तहसीलदार आणि तहसील कार्यालयाचे सर्व अधिकारी, पंचायत समिती, महावितरण, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग आदी प्रशासकीय विभागांचे अधिकारी व चौसाळा जिल्हा परिषद गटातील गावांमधील नागरिक उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी विद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील छत्रपती शिवाजी विद्यालय दि २३ जुन सोमवारी रोजी दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. योगिता होके पाटील होत्या. यावेळी मुंजाबा शिंदे,राजेभाऊ आवाड,सत्यप्रिया होके पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.**

दहावी बोर्ड परीक्षेत प्रथम आलेला आदर्श मस्के, द्वितीय दिपाली आव्हाड,तृतीय साक्षी शिंदे यांचा पुष्पगुच्छ व ड्रेस देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ.योगिता होके पाटील म्हणाल्या की,विद्यार्थ्यांनी नियमितपणे अभ्यास केला पाहिजे.आपले ध्येय निश्चित ◀◀ पान ३ वर



## जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी पदभार स्वीकारला

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या महिला व बालकांना विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारीपदी मनोज ससे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ससे यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.

महिला आणि बालकल्याण विकास अधिकारी चंद्रशेखर केकान यांची सहा महिन्यापूर्वी बदली झाली होती. त्यांच्या रिक्तपदी कालिदास बडे



यांच्याकडे प्रभारी पदभार होता.

शासनाने अहिल्यानगर जिल्ह्याचे महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांची बीड येथे नियुक्ती ◀◀ पान ३ वर

## भारतीय बौद्ध महासभेच्या शहराध्यक्षपदी मायाताई स्वामी तर सरचिटणीसपदी शारदाताई टाकणखार

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्वच्या वतीन माजलगाव शहर शाखेच्या निवाड़ी संदर्भात दि २३ जुन सोमवार रोजी बैठकिचे आयोजन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्वच्या अध्यक्षा कमलताई डोंगरे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली त्यामध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या शहर अध्यक्ष म्हणुन मायाताई स्वामी यांची तर सरचिटणीसपदी शारदाताई टाकणखार यांची निवड करण्यात आली या बरोबरच तालुका संरक्षण उपाध्यक्ष म्हणुन रेखाताई भारस्कर तर संरक्षण सचिव पदी आशाताई जावळे,सुनिताई टाकणखार यांची निवड करण्यात आली.





या बैठकिसाठी जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे ,लिलाताई उजगरे, ◀◀ पान ३ वर

## उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शेकापने केले अडीच तास हालगी बजाओ आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील रोशन पुरी येथील गुर्हाळाने शेतकऱ्याचा ऊसाचे गेल्या सहा महिन्यापासून बिले दिलेली नाहीत त्यामुळे शेतकरी प्रचंड संकटात सापडला असून त्यावर दुबार पेरणीचे दुसरे संकट समोर असतानाही रूपामाता गुऱ्हाळाने शेतकऱ्याच्या उसाचे पैसे देण्यास स्टार प्रवाह सुरू केले असून त्याबाबत अनेक निवेदने देऊनही बिले न दिल्याने शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव येथे शेतकऱ्यांच्या उसाच्या थकीत रकमेसाठी दि २४ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी ठीक ११:०० वाजल्यापासून तब्बल अडीच तास हलगी बजाव आंदोलन प्रचंड घोषणाबाजी सह करण्यात आले यावेळी बोलताना शेतकरी ◀◀ पान ३ वर



## चकलांबा पोलिसांची जुगार अड्डयावर धाड सहा आरोपीसह चार मोटारसायकल जप्त

**चकलांबा । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवायाच्या सूचना दिल्या असल्याने या सूचनेनुसार सोमवारी रात्री गस्त घालत असताना एका शेतात जुगार खेळणाऱ्या सहा जणांना चकलांबा पोलिसांनी ताब्यात घेतले. यावेळी चार मोटारसायकल व सहा मोबाईल असा ३ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



सपोनि संदीप पाटील हे स्टाफसह सोमवारी रात्री गस्त घालत असताना तरडगाव शिवारातील एका शेतात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीस पथकास मिळाली. गस्त घालत असताना ही बाब समोर आल्यानंतर चकलांबा पोलिसांनी सदर ठिकाणी धाड मारली असता पोलीसांना पाहून जुगारी यांनी पळ क्ढला. पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करून सहा ◀◀ पान ३ वर

## आदर्श गुरुकुलात योग दिन उत्साहात साजरा



**माजलगाव । प्रतिनिधी**

**भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श गुरुकुल माजलगाव येथे योग दिनानिमित्त आर्ट ऑफ लिविंगचे प्रशिक्षक नंदकुमार शिंदे, विघ्नहर्ताअर्बनचे चेअरमन महेशराव आगे,आदर्श गुरुकुलचे मार्गदर्शन केशव बादाडे, हनुमान सरवदे, संचालक ओंकार बादाडे,शिक्षिका कोमल काळे, रोहित खटले यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात योग दिन साजरा करण्यात आला.**

आंतरराष्ट्रीय योग दिन (२१ जून) साजरा करण्यासाठी सकाळी पाच वाजता गुरुकुल मधील सर्व स्वच्छता करून प्रा:विधी आवरून सर्व विद्यार्थी योग करण्यासाठी तयार झाले. योग प्रशिक्षक नंदकुमार शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करताना योग प्रणाम कधी व कशा पद्धतीने करावे त्याचे फायदे काय आहेत त्यामुळे शरीर व मन दोन्हीही निरोगी राहते असे उद्गारले.योग प्रणायाम प्रात्यक्षिक केशव बादाडे सरांनी सूक्ष्म व्यायाम, त्रिकोणास, वज्रासन, सूर्यनमस्कार, अनुलोम विलोम, भास्त्रिका, वृक्षासन, अनेक योगासने केली. त्यानंतर मोठ्या उत्साहामध्ये सत्संग झाला. या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य सुमनबाई रनेर, सावित्री बादाडे, अंजली घाडगे यांचे लाभले. विद्यार्थ्यासह सर्वांनी योग प्राणायाम साधना केली.



## एक पेड माँ के नाम अंतर्गत वृक्षारोपण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दे.बा.ग.यो. नू. विद्यालय ( स्वा.रा.ती. रुग्णालय परिसर) मध्ये सोमवारी यो.शि.संस्था संचलित निसर्ग संवर्धन मंडळाच्या माध्यमातून

"एक पेड माँ के नाम " या उपक्रमातर्गत वृक्षारोपण करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते मंचावर सौ.बर्दापूरकर संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास, न.प.च्या प्रशासक प्रियंका टोंगे, स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, संचालक प्रा. माणिकराव लोमटे, प्रा. एन.के.गोळेगावकर, सय्यद पाशु, अभिजीत ◀◀ पान ३ वर

## श्रमदानातून नृसिंहतीर्थ स्मशानभूमीची स्वच्छता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आद्यकवी मुकूंदराज समाधी रस्त्यालगत असलेल्या नृसिंहतीर्थ स्मशानभूमी परिसरात युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या पुढाकाराने स्वच्छता करण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेत स्मशानभुमी परीसरातील खड्डे दगड,माती टाकून बुजविण्यात आले तसेच झाडांची व्यवस्थित कटई आणि अनावश्यक झुडपे काढून परिसराची स्वच्छता करण्यात आली. ही स्मशानभूमी उजाड व डोंगराळ भागात असल्याने दुर्लक्षित आहे पुढील काळात आवश्यक त्या सुविधा करून सुधारणा करण्यावर आणि



अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठीची व्यवस्था करून देण्यासंदर्भात सर्वानुमते चर्चा करण्यात आली.

यावेळी नगरपरिषदेच्या प्रशासक, ब्राम्हण सभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

नृसिंहतीर्थ स्मशानभुमीत आवश्यक गोष्टीसाठी प्रयत्न हवेत

आद्यकवी मुकुंदराज समाधी स्थानाकडे जाणाऱ्या रस्त्यावरच नृसिंहतीर्थ स्मशानभुमी असून गेल्या अनेक वर्षापासून ती दुर्लक्षित आहे. हा भाग ◀◀ पान ३ वर

## चेन स्नॅचिंग करणाऱ्या दोघांना पकडले

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

एकाच दिवशी दोन ठिकाणी चेन स्नॅचिंग करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेने पकडले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ज्योति विजय उदावंत (रा.उमरखेड ता.महागाव जि.यवतमाळ) यांनी पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे फिर्याद दिली होती की,दि.०७ जून रोजी फिर्यादी हया त्यांचे मुली सोबत नातवाचा साखरपुडा बीड येथे असल्याने त्यांचे भाऊ यांचे घरी आल्या होत्या. दि.०८ जून रोजी फिर्यादी व त्यांची मुलगी हया



साखरपुडयाचे सामान खरेदी करण्यासाठी राजीव गांधी चौक येथे आल्या होत्या. दुपारी ०३.०० वा दरम्यान फिर्यादी या रिक्षा मध्ये बसत असताना फिर्यादी यांचे पाठी मागुन दोन अज्ञात ईसम मोटारसायकल वर बसुन आले व फिर्यादी यांचे गळयातील २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण किं.९०,०००/- रु हे हिसकावुन घेवुन गेले. अश्या वर्णनाच्या फिर्यादीवरुन गुन्हा नोंद झाला होता. तसेच पोलीस स्टेशन बीड शहर येथे दि.०८ जून रोजी फिर्यादी नामे शिल्पा अमोल वाव्हळ (रा.फुलाईनगर ता.जि.बीड) यांनी फिर्याद दिल होती की, फिर्यादी हया त्यांचे मुली सोबत खरेदी कामी डी.पी.रोड बीड येथे गेल्या होत्या. फिर्यादी या त्यांची स्कुटी गाडी स्टॅन्डवर लावत असताना फिर्यादी यांचे जवळ तोंडाला बांधुन मोटार सायकलवर बसुन दोन ईसम आले. यातील समोरील ईसमाने डोक्यावर हेल्मेट घातलेले व अंगात पांढऱ्या रंगाचे शर्ट ◀◀ पान ३ वर

## पहाट फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार ॲड.राज पाटील यांना जाहीर

वडवणी । प्रतिनिधी

अँड राज पाटील यांनी लढा दुष्काळीशी फाउंडेशनच्या माध्यमातून जिल्हाभरात लाखो झाडांचे वाटप करुन पर्यावरणाचे संतुलन राहण्याचे सामजीक कार्य करत आहेत.तिगाव दुष्काळमुक्त व टँकर मुक्त करण्यासाठी जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात केलेली आहेत, याच सामाजिक कार्याची दखल संभाजीनगर येथील पहाट फाऊंडेशन घेतली आहे. त्यांना पहाट फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार जाहीर झाला असून



त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन यांचा वर्ष होत आहे.पुरस्कार वितरण सोहळा २८ जून रोजी बुलढाणा येथे होणार आहे.

वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची मोठी हानी होत चाललेली आहे.यामध्ये वेळेवर पाऊस न आल्याने कठीन दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे.सर्व मानवी जीवनाला जीवन जगण्यासाठी ऑक्सिजनची मोठी आवश्यकता आहे. ऑक्सिजनची कमतरता झाली तर काय होऊ शकते,याची प्रचिती कोरोना काळामध्ये सर्वांना आलेली आहे.झाडे टिकली तरच मानव जिवन जगण शक्य आहे.पुढील धोका टाळण्यासाठी पृथ्वीचे संतुलन टिकून राहण्यासाठी झाडे लावने झाडे जगवने,पाणी आडवने पाणी जमीनीत मुरवने ही काळाची ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सरकारी पदावर असताना मी कधीही सहकारी संस्थांची निवडणूक लढवली नाही; शरद पवारांचा अजितदादांना टोला

पुणे । प्रतिनिधी

माळेगाव साखर कारखाना निवडणुकीवरून शरद पवारांनी अजित पवारांनी टीका केली आहे. सरकारमध्ये मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तींनी सहकारी संस्थांच्या निवडणुका लढवू नये, मी माझ्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत सरकारी पदावर असताना कधीही सहकारी संस्थांच्या निवडणुका लढलो नाही असं शरद पवार म्हणाले. ते बारामतीत पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारत होते.

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या निकालाचे चित्र स्पष्ट झालं आहे. त्यामध्ये अजित पवारांच्या निळकंठेश्वर पॅनेलला घवघवीत यश मिळाल्याचं दिसून येतंय. त्याचवेळी शरद पवारांनी त्यांच्यावर नाव न घेता टीका केल्याचं दिसून आलं. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे स्वतः कारखान्याच्या निवडणुकीत उभे आहेत.

विरोधकांना न्याय कसा देणार?





आपण आपल्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत, सरकारी पदावर असताना सहकारी संस्थांची निवडणूक निवडणूक लढवली नाही. विरोधकांना काही अडचण आली तर सरकारी पदावरील व्यक्ती जो कारखान्याचा प्रमुख असेल, तर तो विरोधकांना न्याय कसा देईल? असं शरद पवार म्हणाले.

माळेगाव सहकारी साखर कारखान्यासाठी २२ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीमध्ये अजित पवारांचे निळकंठेश्वर पॅनेल, शरद पवारांच्या नेतृत्वाखाली बळिराजा पॅनेल, भाजप नेते चंद्रराव तावरे- रंजन तावरे यांचे सहकार बचाव शेतकरी पॅनेल आणि कष्टकरी शेतकरी समिती, अपक्षांचे एक पॅनेल, असे चार पॅनेल या निवडणुकीच्या रिंगणात होते.

अजित पवार विजयी

या निवडणुकीचा पहिला निकाल हाती आला असून 'ब वर्ग गटातून' उपमुख्यमंत्री अजित पवार हे विजयी झाले आहेत. १०२ पैकी १०१ मतं वैध ठरली. त्यातील अजित पवारांना ९१ मतं मिळाली आहेत. सहकारी संस्था या गटासाठी मतदान करतात. यामध्ये अजित पवारांनी बाजी मारली आहे.

माळेगावमध्ये क्रॉस व्होटिंगचा फटका कुणाला?

माळेगाव कारखाना निवडणुकीत अजित पवार ब वर्ग गटातून विजयी झाले असले तरी बाकी उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. माळेगाव, सांगवी, पणदरे गटात क्रॉस वोटिंग झालं आहे. मत पत्रिका छाननी सुरू आहे. छाननी झाल्यानंतर मतमोजणी होईल. क्रॉस वोटिंगचा फटका कुणाला बसणार याकडं सर्वांचं लक्ष लागलंय. दरम्यान अजित पवार पॅनेलचे रतनकुमार भोसले आघाडीवर आहेत. तर चंद्रराव तावरे यांचे पॅनेलचे बाबुराव गायकवाड पिछाडीवर आहेत..अनुसूचित जाती जमाती प्रवर्ग गटामधून रतनकुमार भोसले आघाडीवर आहेत

# अखेर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला माजी आमदार महादेव बाबर यांचा रामराम





हडपसर । प्रतिनिधी

हडपसर मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीचे तिकीट न मिळाल्याने ठाकरेंच्या शिवसेनेवर नाराज राहिलेले शिवसेनेचे माजी आमदार महादेव बाबर यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत विविध तर्कवितर्क लढवले जात होते. अखेर, त्यांनी आज अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला 'रामराम' ठोकला आहे. तर हडपसर मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातील चार माजी नगरसेवकांनीही आज मुंबईत अजित पवार गटात प्रवेश केल्याने येथे या पक्षाला खिंडार पडले आहे.

शिवसेनेचे माजी आमदार महादेव बाबर यांच्या प्रवेशानंतर लगेचच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तसेच पुणे शहराचे माजी उपमहापौर निलेश मगर, माजी उपमहापौर बंडूतात्या गायकवाड, माजी नगरसेवक योगेश ससाणे, माजी नगरसेविका हेमलता मगर तसेच माजी आमदार महादेव बाबर यांचे पुत्र प्रसाद बाबर यांच्यासह शिवसेनेच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात जाहीर प्रवेश केला .उपमुख्यमंत्री अजित पवार व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत मुंबईत हे प्रवेश करण्यात आले.

# ४० हजाराची लाच घेताना बारामतीतील प्राचार्य 'लाचलुचपत'च्या जाळ्यात

बारामती । प्रतिनिधी

बारामती तालुक्यातील माळेगाव येथील अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपप्राचार्य व सध्या प्राचार्य पदाचा अतिरिक्त कारभार सांभाळणारे अवधूत भिमाजी जाधवर (वय ५३) यांना ४० हजाराची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली. ही कारवाई मंगळवारी (दि.२४) बारामती शहरातील हॉटेल सिटी इनजवळ करण्यात आली. जाधवर यांच्या विरोधात बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

याप्रकरणी एका तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. तक्रारदार खाजगी पॅरामेडिकल संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांची परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी शासकीय पर्यवेक्षक आवश्यक होते. त्यासाठी तक्रारदाराने संबंधित शासकीय संस्थेकडे पत्राद्वारे विनंती केली होती. जाधवर यांनी पर्यवेक्षक नेमणुकीच्या बदल्यात ४५ विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी दोन हजार याप्रमाणे ९० हजारांची मागणी केली होती. दरम्यान दहा हजाराची रक्कम अगोदर देण्यात आली. उर्वरित रकमेच्या मागणीसाठी जाधवर यांनी तक्रारदाराकडे तगादा लावला होता. तक्रारदाराने या प्रकरणी एसीबीकडे धाव घेतली. एसीबीकडून तक्रारीची शहानिशा करण्यात आली. त्यानंतर सापळा रचून मंगळवारी जाधवर यांना लाच घेताना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलिस निरीक्षक अमोल भोसले, शिपाई कोमल शेटे, कैलास महामुलकर, चंद्रकांत कदम यांनी केली.

# मॉन्सूनपूर्व पावसाचा शेतकऱ्यांना फटका; पुण्यात केवळ २०% खरीप पेरण्या पूर्ण

पुणे । प्रतिनिधी

पुण्यासह राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये मॉन्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावल्याने, पिकांचे नुकसान झालेच, परंतु त्याचा फटकाही पूर्व मशागतीवर झाला असून, पुणे जिल्ह्यात खरीपाच्या केवळ २० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. जिल्ह्यातील तेरा तालुक्यांपैकी शिरूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ४० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. याबाबत जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाने कळविले आहे.

दरम्यान मे महिन्यापासून सुरू झालेल्या पावसाने आता उघडीप दिल्याने पेरण्यांना वेग आला आहे. पुणे जिल्ह्यात खरीप पिकांचे क्षेत्र हे २ लाख २ हजार २६३ हेक्टर इतके असून, यापैकी ४० हजार १८२ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांच्या पेरण्या झाल्या आहेत. एकट्या शिरूर तालुक्यात ११ हजार २२ हेक्टरवर खरीप पेरण्या उरकल्या आहेत.

जिल्ह्यात पाच हजार हेक्टरवर भात रोपवाटिका असून, पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हा, मावळ, मुळशी तसेच खेड, जुन्नर, आंबेगाव तालुक्यांमध्ये प्रामुख्याने भात लागवड केली जाते. यासाठी कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना वेळेत बियाणांचा पुरवठा करण्यात आला आहे. यावर्षी जून महिन्यात दमदार पावसाने हजेरी लावल्याने भात शेतीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले असले, तरी या सलग पावसामुळे काही भागांत रोपवाटिकांची कामे खोळंबली आहेत. पुणे जिल्ह्यात सुमारे ५ हजार ६४ हेक्टर क्षेत्रावर भात रोपवाटिका उभारण्यात आल्या असून, काही ठिकाणी रोपे तयार होण्यास विलंब होत आहे.



विभागात ३६ टक्के पेरण्या

पुणे विभागात ४ लाख ५१ हजार ५०७ हेक्टर म्हणजेच ३६ टक्के पेरण्या झाल्या आहेत. मॉन्सूनपूर्व पाऊस जोरदार झाल्याने आणि मॉन्सून लवकर राज्यात आल्याने पूर्व मशागतीचा फटका खरीप हंगामाच्या पिकांच्या वाढीवर होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.पुणे विभागात आत्तापर्यंत १२ लाख ५६ हजार ४३९ हेक्टरपैकी, सुमारे साडेचार लाख हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने बाजरी, भुईमूग, सोयाबीन, मूग, चवळी, हुलगा, घेवडा, वाटाणा आदींसह अन्य कडधान्यांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.

पावसाने उघडीप दिल्याने जमिनीला वाफसा येत असल्याने शेतकऱ्यांकडून पेरण्यांना सुरुवात केली आहे. त्याचबरोबर पेरणीच्या अगोदर मशागतीही काही ठिकाणी सुरू असल्याने कुळवणीसाठी लगबग सुरू आहे. या आठवड्यात पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्याच्या काही भागात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला होता.विभागामध्ये अहिल्यानगरमध्ये खरीप हंगामातील पेरणीस सुरुवात झाली आहे. बाजरी, मका पीक उगवण अवस्थेत आहे. त्याचबरोबर जिल्ह्यामध्ये तूर, मूग, उडीद, भुईमूग, सोयाबीन पिकांची पेरणी, तर कापूस पिकांची लागवड होऊन उगवण अवस्थेत आहे.

खासदारांनी रेल्वे अधिकाऱ्यांना चांगलेच झापले, बैठकीत नेमकं काय घडलं?

अकोले तालुक्यामध्ये रोपवाटिका क्षेत्रावर १ हजार ८३१ हेक्टर क्षेत्रावर भात रोपे तयार करण्यात आलेली आहेत. पुणे जिल्ह्यात बाजरी, मका पीक उगवण अवस्थेत आहे. मूग पीक उगवण झाली असून, दोन पानांच्या अवस्थेत आहे. सोलापुरात खरीप हंगामात पेरणी झालेले बाजरी पीक उगवण अवस्थेत असून, पीक परिस्थिती समाधानकारक असल्याचे कृषी विभागाच्या अहवालात नमूद केले आहे.

एकूण पुणे विभागात झालेली पेरणी
सरासरी क्षेत्र - १२,५६,४३९
पेरणी झालेले क्षेत्र - ४,५१,५०७
टक्के- ३६ अहिल्यानगर- २,६८,८११ पुणे - ३९,१६३
सोलापूर - १,४३,५३३

# येतील त्यांच्यासोबत, नसतील तर विरोधात लढणार महायुती; निवडणुकीबाबत आमदार सुनील शेळके यांचे स्पष्टीकरण

वडगाव मावळ । प्रतिनिधी

मावळ तालुक्यात आगामी काळात होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या जे येतील त्यांना सोबत घेऊन महायुतीच्या माध्यमातून लढवू, जे येणार नाहीत त्यांच्याविरोधात महायुतीने लढू, असे स्पष्टीकरण आमदार सुनील शेळके यांनी मावळ तालुका राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना केले.



नेते बदलले तरी भाजप कार्यकर्ते सोबत

या वेळी आमदार शेळके यांनी बोलताना तालुक्यात येत्या चार महिन्यांत होणार्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, तळेगाव दाभाडे व लोणावळा नगर परिषद, वडगाव नगरपंचायत या निवडणुका महायुतीच्या माध्यमातून लढविण्याचे स्पष्ट करत जे सोबत येतील त्यांना घेऊ, जे येणार नाहीत त्यांच्याविरोधात महायुती राहील, असेही स्पष्ट केले.

महायुतीचा धर्म पाळताना भाजपच्या नेत्यांनी भूमिका बदलली तरी सर्वसामान्य कार्यकर्ता आपल्याबरोबर होता, त्यामुळे त्यांना सोबत घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. विठ्ठलराव शिंदे यांनीही जे येतील त्यांना बरोबर घेऊन जे येणार नाही त्यांना सोडून पुढे जायचे आहे, असे मत व्यक्त करत येत्या निवडणुकांमध्ये आपली ताकद दाखवायची वेळ आली आहे, असे सांगितले.

गणेश ढोरे म्हणाले, की विधानसभेप्रमाणे तितक्याच ताकदीने आगामी निवडणुका लढवायच्या आहेत. त्यादृष्टीने कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन केले. तालुकाध्यक्ष गणेश खांडगे म्हणाले ज्यांच्यामुळे आपण आहोत, त्या कार्यकर्त्यांना बळ देण्याची आता वेळ आली आहे.तालुक्यात राष्ट्रवादीचे आमदार झाल्यानंतर पहिल्यांदाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. पाच वर्षे आपण कार्यकर्त्यांना राबवून घेतले त्यांनीही त्यांचे कर्तव्य पार पाडले. त्यामुळे आता त्यांना ताकद द्यावी, असे आवाहन केले.

कोअर कमिटीशिवाय कुठलाही निर्णय नाही

तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी आगामी काळात विभाग व शहर पातळीवर प्रत्येकी २० जणांची कोअर कमिटी केली जाणार असल्याचे सांगून त्या भागातील किंवा शहरातील कोणताही निर्णय, विकासकामे ही संबंधित कोअर कमिटी शिवाय घेऊ नये, असे आवाहन केले. यावर बोलताना आमदार शेळके यांनी कोअर कमिटीचा निर्णय स्वतः मलाही मान्य असेल, असे स्पष्ट करून उद्या ज्यांना या कमिटीचा निर्णय मान्य होणार नसेल त्यांनी आजचा आपला मार्ग शोधावा, असेही स्पष्ट केले. पदाधिकारी निवड, शासकीय कमिटी नियुक्त्या, उमेदवारी, पक्षप्रवेश, विकासकामे याबाबतचेनर्णय घेण्याचे सर्व अधिकारीकोअर कमिटीला राहतील,असेही सांगितले.

आप शुरुवात करोगे तो एंड मैं करूंगा

आमदार शेळके यांनी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या काही पदाधिकार्यांच्या भाजप प्रवेशाबाबत बोलताना ज्यांना अजित पवारांचे नेतृत्व मान्य नाही त्यांना खुशाल घ्या, पण जे अजित पवारांचे नेतृत्व मानतात पण त्यांना काही आमिषे दाखवून प्रवेश देण्याचा प्रयत्न करून सुरुवात तुम्ही केली तर शेवट मी करील, असाही इशारा दिला.

# धनकवडी परिसरात गुरूवारी पाणी बंद

पुणे । प्रतिनिधी

आंबेगाव पठार व धनकवडी येथे स्थापत्य विषयक तातडीच्या देखभाल दुरुस्ती कामामुळे येत्या गुरुवारी (२६ जून) काही भागातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच शुक्रवारी उशिरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होणार त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

या भागातील पाणी पुरवठा राहणार बंद

निलगिरी चौक, चिंतामणी ज्ञानपीठ ते त्रिमूर्ती चौक, भारती विद्यापीठ, आंबेगाव पठार सर्व्हे नं. १५ ते ३०, धनकवडी सर्व्हे नं. २८,२९,३०,३४ ते ३७, चैतन्यनगर, अक्षयनगर, राजमुद्रा सोसायटी, रक्षा सोसायटी, विद्यानगरी, मोहननगर इत्यादी.

# इराण-इस्त्रायल युद्धाने खाद्यतेलांची उसळी

पुणे । प्रतिनिधी

इराण-इस्रायल युद्धात आता अमेरिकेने उडी घेतल्याने संघर्षाची ही स्थिती बराच काळ अशीच राहण्याची चिन्हे आहेत. यामुळे जगभरातून खाद्यतेलाला मागणी वाढत असून, कच्च्या मालाचे भाव वाढले आहेत. त्यामुळे खाद्यतेलाच्या दराने उसळी घेतली आहे. मार्केट यार्डमधील घाऊक बाजारात सर्व प्रकारच्या तेलाचे दर किलोमागे तीन ते चार रुपयांनी तसेच पंधरा लिटर, किलोच्या डब्यामागे पन्नास ते साठ रुपयांनी वाढले आहेत.

युद्ध सुरू होण्यापूर्वी केंद्र सरकारने आयात शुल्क १० टक्क्याने कमी केले होते. त्यामुळे खाद्यतेलाचे दर काही प्रमाणात कमी झाले होते. मात्र, इराण-इस्रायल युद्धामुळे खनिजतेलाच्या किमती बॅरलमागे सहा डॉलर्सनी वाढल्या आहेत. त्यामुळे सरकी, पाम आणि सूर्यफूल तेलाच्या दरांत वाढ झाली. सध्या तेलाची मागणी कमी आहे. आगामी सणासुदीच्या काळात मागणी वाढल्यास भाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

गोटा खोबऱ्याचे भाव वाढले

नारळाचे उत्पादन घटल्याने गोटा खोबऱ्याच्या भावात मागील आठवड्यात घाऊक बाजारात किलोमागे २ ते ३ रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे खोबरेल तेलाचे भाव तेजीत आहेत. २५ किलोच्या डब्याचा दर ६००० रुपयांवर पोहोचला आहे. दर उच्चांकी पातळीवर गेल्यामुळे सध्या बाजारात खोबरेल तेलाची आवक जवळपास थांबली आहे.

# चार्जिंगअभावी 'शिवनेरी' प्रवास अर्धवट; प्रवाशांची होतेय प्रचंड गैरसोय

पुणे । प्रतिनिधी

**राज्य परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) ताफ्यात असलेल्या 'शिवनेरी' इलेक्ट्रिक बस सेवेमध्ये तांत्रिक बिघाडामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. चार्जिंग अपुरी असल्याने अनेक वेळा प्रवास अर्धवट थांबवावा लागतो, ज्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.**



पुण्यातील वाहतूक मार्गांवर सध्या सुमारे ३० ई-शिवनेरी बस कार्यरत आहेत. ही सेवा सुरुवातीला पर्यावरणपूरक व आधुनिक अशी ओळख निर्माण करत असली तरी, सध्या बस चार्जिंगची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. प्रवास सुरू असताना चार्जिंग संपल्यास चालकांना बस थांबवावी लागते. परिणामी, प्रवाशांचा वेळ व पैसा वाया जातो, तसेच त्यांच्या प्रवासाच्या योजनाही बिघडतात. यावर एमएसआरटीसीकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही, मात्र सूत्रांच्या माहितीनुसार बस चार्जिंगसाठी उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा अभाव व देखभालीतील हलगर्जीपणा यामुळे ही स्थिती उद्भवते आहे.

याबाबत बोलतांना एसटीचे विभागीय वाहतूक अधिकारी सचिन शिंदे म्हणाले, पुणे विभागातील इ बस पूर्ण क्षमतेने चार्ज झाल्याशिवाय आम्ही डेपोच्या बाहेर काढत नाही. कोणती समस्या आहे, याचा तपास केला जाईल. त्यानंतरच अधिक बोलणे योग्य ठरेल.


# रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण; जिल्हाधिकारी जितेंद्र डुडींच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना

पुणे । प्रतिनिधी

रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण लक्षात घेता अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरीता जिल्ह्यात रस्ते सुरक्षा विषयक आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच जिल्ह्यातील अपघाताच्या ठिकाणांची (ब्लॅकस्पॉट) व्यापक स्वरुपात जनजागृती करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सोमवारी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर, कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई, प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांच्यासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पोलीस, प्रादेशिक परिवहन विभाग, पुणे महापालिका, पिंपरी चिंचवड महापालिका, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

डूडी म्हणाले, पुणे जिल्ह्यात पुणे महापालिका हद्दीत १५ , भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण २२ , महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ २, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ १ आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत २ असे एकूण ४२ ब्लॅकस्पॉट आहेत. रस्ते सुरक्षितितेच्यादृष्टीने या ठिकाणी लघुकालीन तसेच दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक असून, अशा ठिकाणी जाण्यास प्रतिबंध किंवा ठराविक कालावधीसाठी निर्बंध लादण्याची



गरज आहे. याचबरोबर येथे दिशादर्शक फलक लावणे, राडारोडा साफ करणे, बॅरिकेटींग आदी उपाययोजना करणे जरूरी असून, या उपाययोजनांची पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागाने तपासणी करुन येत्या १ महिन्यात अहवाल सादर करावा असे त्यांनी सांगितले.

मागील एका वर्षात जिल्ह्यात झालेल्या अपघाताची ठिकाणनिहाय कारणे शोधावीत. याअनुषंगाने सर्व संबंधित विभागाला सुरक्षात्मक उपाययोजना सूचना कराव्यात, याचे पालन सर्व संबधित यंत्रणांनी करावे. परिणामी जिल्ह्यातील इतर ठिकाणी याचा उपयोग होईल. खडकवासला धरण चौकातील वाहतूक कोंडी टाळण्याकरीता वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी असे सांगून डुडी यांनी, रस्ते सुरक्षा जनजागृतीकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती दिली. यावेळी बहीर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे जिल्हा रस्ता सुरक्षा समिती अंतर्गत करण्यात आलेल्या कामाबाबत माहिती दिली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पुणे महानगरपालिकेला सूचना

यंदा मान्सूनचे आगमन महाराष्ट्रात लवकर झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गेल्या वर्षी पुण्यामध्ये जोरदार पाऊस झाला होता. यामुळे धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. या पाण्यामुळे येथील नदीकाठच्या गावांना मोठा फटका बसला होता. लोकांच्या घरात पाणी शिरले होते. अनेक वाहने पाण्यात वाहून गेली होती. मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं होते. यंदाचा पावसाळा अधिक असल्याने आता प्रशासन अलर्ट मोडवरून आले आहे. तशा सचूना पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी तशा सूचना प्रशासनाला केल्या आहेत.